## राजकारणात मी अपघाताने आलो –राज ठाकरे



**मुंबई :** लोकमत महाराष्ट्रीयन ऑफ द इयर पुरस्काराचा सोहळा बुधवारी (दि. २६) वरळीतील एनएससीआय डोममध्ये झाला. या सोहळ्यास निरनिराळ्या क्षेत्रांतील दिग्गज उपस्थित होते. या वेळी मनसे प्रमुख राज ठाकरे यांची खासदार अमोल कोल्हे आणि बँकर अमृता फडणवीस यांनी मुलाखत घेतली. मुलाखतीमध्ये राज यांना तुम्ही राजकारणी झाले नसता, तर काय बनले असते असे विचारले असता त्यांनी मी राजकारणात अपघाताने आल्याचे म्हटले. माझी खरी आवड ही सिनेसृष्टी होती. तिथे मला करिअर करायचे होते, असे त्यांनी सांगितले. या वेळी आमदार प्रसाद लाड यांना उद्योगमंत्री उदय सामंत आणि राज ठाकरे यांच्या हस्ते 'लोकमत'च्या विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.


रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १५ ◆ अंक २७८
www.ramprahar.com
# राम प्रहर
गुरुवार, २७ एप्रिल २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


स्थानिक मच्छीमार बांधवांना मिळणार रोजगाराची संधी/२
रोह्यात विनापरवाना शेकडो झाडांची कत्तल/५
आरसीएफ कामगार चषक आदिवासी कबड्डी स्पर्धा/८


# जलसंवर्धनात महाराष्ट्र देशात अव्वल

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून जनतेचे अभिनंदन

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने भारतातील जलाशयांच्या गणनेचा पहिला अहवाल जाहीर केला असून त्यात महाराष्ट्राचा देशात पहिला क्रमांक आला आहे. याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेचे अभिनंदन केले आहे.

सर्व जलाशयांची तपशीलवार माहिती देणारा राष्ट्रीय माहितीकोष विकसित करणे या जलाशय गणनेचा उद्देश आहे. वर्ष २०१८-१९मध्ये करण्यात आलेल्या या गणनेत देशातील सर्व राज्ये तसेच केंद्रशासित प्रदेश यांच्या क्षेत्रातील २.४ दशलक्षाहून अधिक जलाशयांची मोजणी करण्यात आली. या संर्वधनात महाराष्ट्राने बाजी मारली आहे.

**केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने जाहीर केलेल्या भारतातील जलाशय गणनेच्या पहिल्या अहवालात आपल्या महाराष्ट्राचा देशात पहिला क्रमांक आला आहे हे सांगताना मला अत्यानंद होतो. जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे आदी योजना एकत्रितपणे राबविल्याचे हे यश आहे.**
**–देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**



जलयुक्त शिवार आणि अन्य जलसंवर्धनाच्या योजनांना लोकचळवळ बनविणाऱ्या महाराष्ट्रातील सर्व नागरिक व सामाजिक संघटनांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मन:पूर्वक अभिनंदन केले असून या कार्यात सहभागी सर्वांचे आभारसुद्धा मानले आहेत. हे आपल्या सर्वांचे सामूहिक यश आहे. आता जलयुक्त शिवार २.० अभियानसुद्धा असेच सर्वांनी यशस्वी करावे, असे आवाहन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी केले आहे.

या अहवालाबाबत माहिती देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अन्य राज्यांत तळी आणि जलसाठे अधिक असली तरी जलसंवर्धनाच्या बाबतीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आला आहे. या अहवालातील महत्त्वाचे निरीक्षण म्हणजे बहुसंख्य जलसाठे हे जलसंवर्धन योजनांमधील आहेत.

### महाराष्ट्रासाठी अभिमानाचा क्षण –एकनाथ शिंदे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ट्विट करीत या संदर्भात माहिती दिली. महाराष्ट्रासाठी हा अभिमानाचा क्षण! जलशक्ती मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या जलसंधारणाच्या पहिल्या जनगणनेच्या अहवालानुसार जलसंधारण योजना मोठ्या प्रमाणावर आणि यशस्वीपणे राबविण्यात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. देशात सर्वाधिक जलसंधारणाच्या योजना महाराष्ट्राने राबविल्या आहेत. महाराष्ट्राला पाण्याची समस्या यापुढे जाणवणार नाही याबद्दल महायुती सरकार कटिबद्ध असून त्यास अनुसरून विविध योजनादेखील यशस्वीपणे सरकार राबवित आहे, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

## नक्षली हल्ल्यात ११ जवान शहीद

### छत्तीसगडच्या दंतेवाडा येथील घटना



**दंतेवाडा : वृत्तसंस्था**

छत्तीसगडमधील दंतेवाडा येथे नक्षलवाद्यांनी बुधवारी (दि. २६) मोठा हल्ला केला. नक्षलींनी घडवून आणलेल्या आयडी स्फोटात ११ जवान शहीद झाले आहेत.

दंतेवाडाच्या अरणपूर भागात नक्षलवाद्यांनी आयडीचा स्फोट केला. तेथे नक्षलवादी लपल्याची बातमी मिळाली होती. त्यानुसार डीआरजी दल नक्षलविरोधी अभियानासाठी अरणपूरला गेले होते. शोधमोहिमेनंतर सर्व जवान परतत असताना नक्षलवाद्यांनी आयडीचा स्फोट केला. यात १० डीआरजी जवान व एक चालक असे ११ जण शहीद झाले. दरम्यान, स्फोटानंतर घटनास्थळी मोठ्या प्रमाणात सीआरपीएफचे जवान पाठवण्यात आले आहेत तसेच वैद्यकीय सुविधांसाठी दोन रुग्णवाहिकाही रवाना करण्यात आल्या आहेत.

**छत्तीसगडमध्ये जवानांवर करण्यात आलेल्या हल्ल्याचा मी निषेध करतो. त्याचप्रमाणे शहीद शूर जवानांना श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांचे बलिदान सदैव स्मरणात राहील. त्यांच्या परिवाराप्रति मी संवेदना व्यक्त करतो.**
**–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

### केंद्रीय गृहमंत्र्यांकडून गंभीर दखल

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या दहशतवादी हल्ल्याची गंभीरपणे दखल घेत छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्याशी चर्चा केली. शाह यांनी आवश्यक ती सर्व मदत करण्याचे आश्वासन छत्तीसगडच्या मुख्यमंत्र्यांना दिले आहे.

## महाराष्ट्र दिनी मुंबईत दहशतवादी हल्ल्याचा कट

### शिवाजी पार्क परिसरात जमावबंदी

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राची राजधानी मुंबईत १ मे या महाराष्ट्र दिनी दहशतवादी हल्ला घडविण्याचा कट रचण्यात येत आहे. गुप्तचर विभागाच्या अहवालात हा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे मुंबई पोलीस दल अलर्ट मोडवर आले आहे.

१ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त मुंबईतील शिवाजी पार्कवर परेड होणार आहे. या परेडदरम्यान दहशतवादी हल्ला होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर शिवाजी पार्क परिसरात कलम १४४ अर्थात जमावबंदी लागू करण्यात आली आहे. दहशतवादी हल्ल्याच्या कटामुळे शिवाजी पार्कचा परिसर नो फ्लाईंग झोन म्हणूनही घोषित करण्यात आला असून प्रत्येक संशयित व्यक्तीची चौकशी केली जात आहे.

## मुरूड उसरोलीतील शेकापचा लाचखोर सरपंच जेरबंद

### 'एलसीबी'ची कारवाई



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील उसरोली ग्रामपंचायतीचे शेतकरी कामगार पक्षाचे सरपंच मनीष नांदगावकर यांना एका शेतकऱ्याकडून ५० हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एलसीबी) पथकाने रंगेहाथ पकडले. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर असे की, उसरोली ग्रामपंचायत हद्दीतील आदाड येथील तक्रारदार शेतकरी यांनी गांडूळ खत बनविण्यासाठी शेडचे असेसमेंट नोंद करण्याकरिता ग्रामपंचायतीमध्ये रितसर अर्ज केला होता. ही परवानगी देण्यासाठी सरपंच मनीष नांदगावकर यांनी शेतकऱ्याकडे ७५ हजार रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीअंती ५० हजार रुपये देण्याचे ठरले. दरम्यान, या शेतकऱ्याने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्यानुसार या पथकाने सापळा रचून सरपंच मनीष नांदगावकर यांना मंगळवारी (दि. २५) ग्रामपंचायत कार्यालयात ५० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडून ताब्यात घेतले.

लाचखोर सरपंच मनीष नांदगावकर यांना न्यायालयात हजर केले असता त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या लाचखोरीप्रकरणी पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे अधिक तपास करीत आहेत.

### निवडक

#### कर्नाटकात पंतप्रधान मोदींच्या होणार सभा आणि रोड शो

**बंगळुरू :** कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी सध्या राजकीय पक्षांच्या प्रचाराला वेग आला आहे. सत्ताधारी भाजपने तर प्रचाराचा धुरळाच उडवला आहे. भाजपचे स्टार प्रचारक पंतप्रधान नरेंद्र मोदी कर्नाटकात २८ एप्रिल ते ७ मेदरम्यान सुमारे १५ जाहीर सभा आणि रोड शो करणार आहेत. त्यामुळे राज्यातील वर्चस्व टिकवून ठेवण्याच्या पक्षाच्या प्रयत्नांना आणखी बळ मिळणार आहे.

#### परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी पाकिस्तानला पुन्हा सुनावले

**नवी दिल्ली :** पुढच्या आठवड्यात पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो झरदारी भारत दौऱ्यावर येत आहेत. या पार्श्वभूमीवर भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी, सीमावर्ती भागात दहशतवाद माजवणाऱ्या शेजाऱ्यांशी संबंध ठेवणे फार कठीण आहे, असे म्हटले आहे तसेच सीमेवरील कारवायांचा निषेध केला आहे.

## मुख्यमंत्र्यांकडून ६५ फाईल्सचा निपटारा

### सुटीवर गेल्याच्या टीकेवरून विरोधकांना उत्तर



#### खरंतर मी डबल ड्युटीवर!

रजेवर असल्याच्या चर्चेवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही स्पष्टीकरण दिले. मी आता सातारा दौऱ्यावर आहे. इथे येऊन मी तापोळ्यातील पुलाची पाहणी केली आणि तापोळा-महाबळेश्वर रस्त्याचे भूमिपूजन केले तसेच महाबळेश्वर येथील पर्यटनाच्या दृष्टीनेही आढावा बैठक घेतली. त्यामुळे मी रजेवर आहे हे खरे नाही. खरंतर मी डबल ड्युटीवर आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

**सातारा : प्रतिनिधी**

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यासह महाविकास आघाडीतील नेत्यांनी राज्यातील महत्त्वाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे रजेवर गेले असे म्हणत यांच्यावर टीका केली होती. विरोधकांच्या या टीकेला मुख्यमंत्र्यांनी कामाद्वारे उत्तर दिले आहे. सातारा दौऱ्यावर असतानाही त्यांनी तब्बल ६५ फाईल्सचा निपटारा केल्याची माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आली.

मुख्यमंत्री सचिवालयात विविध विभागांच्या फाईल्स येत असतात. त्या प्रलंबित राहू नये म्हणून नियमित निपटारा करण्यात येतो. मुख्यमंत्री सध्या सातारा दौऱ्यावर असून सचिवालयातील फाईल्स प्रलंबित राहू नये म्हणून त्यांनी मंगळवारी दूरदृश्य प्रणालीद्वारे अतिरिक्त मुख्य सचिव तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन विविध विभागांच्या ६५ फाईल्सचा निपटारा केला तसेच आवश्यक त्या सूचनाही केल्या.

## आदईत शिव मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात

### आमदार प्रशांत ठाकूर, रत्नप्रभा घरत यांची प्रमुख उपस्थिती




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील आदई येथील प्राचीन स्वयंभू शिव मंदिराचा प्रथम वर्धापन दिन मंगळवारी (दि. २५) मोठ्या उत्साहात साजरा झाला. या वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, या वेळी महिलांसाठी हळदी कुंकू तसेच होम मिनिस्टर कार्यक्रम रंगला. भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. त्यांच्या हस्ते लकी ड्रॉ काढून महिलांना पैठणी देण्यात आली.

या कार्यक्रमाला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. 'अगं अगं बनशी बनशी'फेम सनी फडके आणि अनुष्का कदम कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण होते. या वेळी पनवेल महापालिकेच्या माजी उपहापौर चारुशीला घरत, सीताताई पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, नीता माळी, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, लीना पाटील, प्रतीभा भोईर, आदईच्या माजी सरपंच ज्योती भोपी, दीपिका शेळके, ज्योती काकडे, जाई शेळके, आयोजक जगदीश शेळके, महादू शेळके, राजेश काकडे, निलेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, श्रीचंद भंडारी, बाळाशेठ पाटील, कैलास पाटील, किरण शेळके, एकनाथ शेळके, मंगेश भोपी, निलेश गडगे, राहुल पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

### हळदी कुंकू, होम मिनिस्टर कार्यक्रम रंगला





### मन की बात @ १००

## विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सहभाग



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी मन की बात या कार्यक्रमामधून देशवासीयांशी संवाद साधतात आणि त्यांना प्रेरणा देतात. येत्या रविवारी म्हणजे ३० एप्रिलला 'मन की बात'चा १००वा भाग प्रसारित होणार आहे. यानिमित्ताने बुधवारी (दि. २६) राजधानी दिल्लीत मन की बात @ १०० या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. विशेष म्हणजे या वेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात अभिनेता आमिर खान, रवीना टंडन यांच्यासह पुद्दुचेरीच्या माजी उपराज्यपाल किरण बेदी, संगीतकार रिक्की केज, भारताची आघाडीची महिला बॉक्सर निकहत झरीन आणि दीपा मलिक, निलेश मिश्रा, उद्योजक संजीव भीकचंदानी, मोहनदास पई सहभागी झाले होते.

#### कार्यक्रम प्रचंड लोकप्रिय

एका सर्व्हेनुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मन की बात हा कार्यक्रम जवळपास २३ कोटी लोकं ऐकतात. एकूण लोकांपैकी ४४.७ टक्के लोकं टीव्हीवर हा कार्यक्रम ऐकतात, तर ३७.६ टक्के लोकं मोबाईलद्वारे या कार्यक्रमाशी जोडले जातात. विशेष म्हणजे हा कार्यक्रम २२ भारतीय भाषांबरोबर फ्रेंच, चिनी, इंडोनिशियाई, तिब्बती, बर्मी, बलूची, अरबी, पश्तू, फारसी, दारी आणि स्वाहिली यांसारख्या ११ परदेशी भाषांमध्येही प्रसारित केला जातो.

येत्या रविवारी होणाऱ्या 'मन की बात'मध्ये देशभरातील १००हून अधिक नागरिक सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाच्या अखेरीस केंद्रीय गृहमंत्री अमित शाह संबोधित करतील. या वेळी ते एक स्मारक शिक्का आणि टपाल तिकिटाचे लोकार्पण करणार आहेत.

## आयकर विभागाकडून ३,३३३ कोटींचे बेहिशेबी व्यवहार उघड

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक शहरात आयकर विभागाने गेल्या पाच दिवसांपासून काही करबुडव्या बांधकाम व्यावसायिकांवर छापेमारी सुरू होती. ही कारवाई मंगळवारी संपली असून यात तब्बल तीन हजार ३३३ कोटींचे बेहिशेबी मालमत्तेचे व्यवहार उघडकीस आले आहेत, तर साडेपाच कोटींची रोकड आणि दागिनेही जप्त करण्यात आले आहेत. आयकर विभागाची ही महाराष्ट्रातील सर्वांत मोठी कारवाई असल्याचे सांगण्यात येत आहे.

नाशिकच्या आयकर अन्वेषण विभागासह छत्रपती संभाजीनगर, ठाणे, पुणे, मुंबई, नागपूर कार्यालयातील सुमारे २२५ अधिकारी-कर्मचाऱ्यांचे पथक नाशिकमध्ये दिवस-रात्र ही कारवाई करीत होते. जवळपास १०० खासगी वाहनांतून हे पथक नाशिकमध्ये पहाटे दाखल झाले होते. या पथकांनी नाशिकमधील बांधकाम व्यावसायिकांची कार्यालये, बंगले, फार्म हाऊसवर छापे टाकले. काही पथकांनी इगतपुरी शहरातदेखील छापा टाकला होता. तेथील एका बड्या लॉटरी व्यावसायिकाकडे जवळपास १० ते १५ अधिकाऱ्यांनी तळ ठोकून दिवसभर चौकशी केली. याच छाप्यात सुमारे ७० ते ८० कोटींची बेहिशेबी मालमत्ता आढळून आल्याची चर्चा आहे.

# एक लाख मराठा उद्योजक तयार करणार

## अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाने राज्य सरकारच्या सहकार्याने एक लाख मराठा उद्योजक तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, अशी माहिती महामंडळाचे अध्यक्ष आणि भाजप नेते नरेंद्र पाटील यांनी दिली. भाजप प्रदेश कार्यालयात बुधवारी झालेल्या पत्रकार परिषदेत पाटील बोलत होते.

या वेळी भाजप मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये व माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन उपस्थित होते. बुधवारी महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या काही



महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती पाटील यांनी या वेळी दिली. पाटील यांनी सांगितले की, महामंडळाच्या ५५६ लाभार्थ्यांना कर्ज आधी मिळाले, मात्र प्रमाणपत्र नंतर मिळाले. या लाभार्थ्यांना व्याज परतावा योजनेचा लाभ देण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे. आघाडी सरकारने बंद केलेली ट्रॅक्टर खरेदीसाठी कर्ज देण्याची योजना सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही महामंडळाने घेतला आहे. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजने अंतर्गत असलेली १० लाखांची मर्यादा १५ लाखांपर्यंत वाढवून कालावधी परतफेड सात वर्षांपर्यंत करण्यात आला आहे.

मराठा समाजातील छोटे मोठे व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या तरुणांना बळ देण्यासाठी लघु कर्ज योजनेची सुरुवात करण्यात येणार असून त्या अंतर्गत दोन लाखांपर्यंत कर्ज देण्यात येईल. या कर्जावरील व्याज परतावा महामंडळ देईल. मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज योजना सुरू करण्यात येणार आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित होणार आहे, असे पाटील यांनी नमूद केले. शिंदे-फडणवीस सरकार हे मराठा समाजाची आर्थिक प्रगती साध्य करण्यासाठी अथक प्रयत्न करीत असल्याचे पाटील यांनी सांगितले.

महामंडळ कर्ज योजनांची व्याप्ती वाढवण्यासाठी लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड यांच्या उपस्थितीत सर्व राष्ट्रीयीकृत बँकांच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार असल्याचे पाटील म्हणाले.

## ठाणे ईट राईट मिलेट मेळावा

**ठाणे : प्रतिनिधी**

संयुक्त राष्ट्रसंघाने यंदाचे वर्ष हे आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्ष म्हणून जाहीर केले असून या पार्श्वभूमीवर ठाणे ईट राईट मिलेट मेळावा आणि वॉकथॉनचे आयोजन गावदेवी मैदानात रविवारी (दि. २९) करण्यात आले आहे. यातून भरड धान्याचा आहारात समावेश करण्याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

याठिकाणी राज्यपाल रमेश बैस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उपस्थिती लावणार आहेत. या उपक्रमात खाद्यपदार्थांच्या स्टॉलसची रेलचेल तसेच वॉकथॉनूधन सुरक्षित व पौष्टीक अन्नविषयी जनजागृती करण्यात येणार आहे.

## अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या आरोपीस सक्तमजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल सत्र न्यायालयाच्या विशेष न्यायाधीश सईदा शेख यांनी आरोपी अनिरुद्ध उर्फ अशीरउल्ला महंमद युनूस (वय ३२, रा. पंचशीलनगर, पनवेल) यास अल्पवयीन मुलीवर बलात्कार करण्याच्या आरोपाखाली १० वर्षे सक्त मजुरीची शिक्षा सुनावली आहे. हा निकाल बुधवारी (दि. २६) देण्यात आला.

सविस्तर माहिती अशी की, १६ वर्षीय अल्पवयीन मुलीसोबत आरोपी अनिरुद्ध उर्फ अशीरउल्ला याने प्रेमसंबंध ठेवून तिला लग्नाचे आमिष दाखविले. त्याने २०११ ते २०१३पर्यंत तिच्याशी वारंवार शारीरिक संबंध ठेवले. यात ही तरुणी गरोदर राहिली. याबाबत तरुणीच्या तक्रारीनुसार खांदेश्वर पोलिसांत गुन्हा दाखल झाला होता.

या प्रकरणी सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता अ‍ॅड. राजेंद्र येरुणकर यांनी पाच साक्षीदार तपासले. पीडित मुलगी व तपासी अंमलदारांची या खटल्यात साक्ष महत्त्वपूर्ण ठरली. यानुसार अ‍ॅड. राजेंद्र येरूणकर यांनी न्यायालयासमोर केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून विशेष न्यायालयाने आरोपी अनिरुद्ध याला १० वर्षे सक्तमजुरी व १० हजार दंडाची शिक्षा सुनावली. न्यायालयाच्या या निकालाचे सर्व स्तरातील नागरिकांनी स्वागत केले आहे.

# स्वच्छ हवा कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमाची नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नवी मुंबई शहर स्वच्छ हवा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याकरिता विविध उपक्रम राबविले जात असून पर्यावरणपूरक उपाययोजनांद्वारे हवा गुणवत्ता वाढीसाठी प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात येत आहे. याबाबत महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष बैठकीत आयुक्तांनी सविस्तर आढावा घेतला व कामांच्या नियोजनाविषयी निर्देश दिले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, शहर अभियंता संजय देसाई, प्रशासन व उद्यान विभागाचे उपआयुक्त नितीन नार्वेकर, परिमंडळ १चे उपआयुक्त सोमनाथ पोटरे, परिमंडळ २चे उपआयुक्त डॉ. अमरिश पटनिगेरे व संबधित विभागप्रमुख, अधिकारी तसेच एनसीएपीचे नोडल अधिकारी तथा अतिरिक्त शहर अभियंता शिरीष आरदवाड आदी उपस्थित होते.

हवेतील धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी रस्ते नियमितपणे धुणे, त्यासाठी पुनर्प्रक्रियाकृत पाणी वापरून पिण्याच्या पाण्याची बचत करणे, मुख्य रहदारीच्या चौकातील कारंजे नियमित सुरू ठेवणे, फ्लेमिंगो पॉईंट्सचे संवर्धन करणे, प्रदूषणकारी कॉरी व आरएमसी प्लान्टवर कारवाई करण्यात येत आहे. या पुढील कालावधीत स्वच्छ हवा कृती आराखड्यांतर्गत धूळ जास्त प्रमाणात धूळ निर्माण होते, अशा ठिकाणी वॉटर स्प्रिंकलर सिस्टिमचा वापर करण्यासाठी सकारात्माक पावले उचलण्यात यावीत, असे निश्चित करण्यात आले. एमआयडीसी क्षेत्रातील सुरू असलेल्या कामांच्या ठिकाणी धूळ प्रतिबंधक उपायोजना राबविणेबाबत संबंधितांना एमआयडीसीमार्फत सूचना देण्यात याव्यात, असे निश्चित करण्यात आले. महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या इमारती व इतर बांधकामाच्या ठिकाणीही प्रदूषण प्रतिबंधक उपाययोजना काटेकोरपणे राबविण्यात याव्यात याकडे विभाग कार्यालय स्तरावरुन बारकाईने लक्ष दिले जावे असे निर्देश आयुक्तांनी दिले.

## घाटकोपर-वर्सोवा मेट्रोमध्ये बिघाड

**मुंबई : प्रतिनिधी**

घाटकोपर-वर्सोवा मेट्रोमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने बुधवारी (दि. २६) मेट्रो सेवा ठप्प झाली होती. सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास घाटकोपर-मेट्रो वाहतूक विस्कळीत झाली होती. त्यामुळे दोन्ही मार्गावरील मेट्रो वाहतूक थांबवण्यात आली.

ऐन गर्दीच्या वेळी बिघाड झाल्याने प्रवाशांचे हाल झाले. इच्छित स्थळी जाण्यासाठी बेस्ट बस, रिक्षाचा पर्याय वापरावा लागला. परिणामी बसमधील गर्दी आणखीच वाढली.

## पनवेल वाहतूक पोलीस शाखेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना महासंचालक सन्मानचिन्ह

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र पोलीस विभागात विविध प्रवर्गामध्ये केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल आणि उल्लेखनीय, प्रसंशनिय सेवेबद्दल एकूण ८०० जणांना बुधवारी (दि. २६) सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये पनवेल वाहतूक वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय नाळे यांच्यासह नेरूळ पोलीस निरीक्षक महेश पाटील व तळोजा पोलीस हवालदार विजय पाटील यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र शासनातर्फे एकूण ८०० जणांना पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. त्यामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सर्वाधिक समावेश



आहे. त्यानंतर मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर आदी भागांचा समावेश आहे. तसेच नवी मुंबई परिमंडळ अंतर्गत परिमंडळ १ व परिमंडळ २मधून वपोनि संजय नाळे, निरीक्षक संजय चव्हाण, महेश पाटील, प्रकाश मोरे, उपनिरीक्षक गणेश खांडेकर, प्रदीप वाघ, अविनाश तांबे, हवालदार जगदीश पाटील, महेश वायकर, विजय पाटील, लक्ष्मण पवार, भानुदास मोटे आदींचा समावेश आहे.

# स्थानिक मच्छीमार बांधवांना रोजगाराची संधी

## मासळी उतरवण्याच्या ४५ केंद्रांवर ‘सागरमित्र’ची नियुक्ती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत जिल्ह्यात मासळी उतरवण्याच्या ४५ केंद्रांवर सागरमित्र या पदाची तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात येणार आहे. यामुळे जिल्ह्यातील स्थानिक मच्छीमार तरुणांना रोजगाराची संधी मिळणार आहे.

सागरमित्र हे सरकार आणि मच्छीमार यांच्यातील दुवा असणार आहेत. मच्छीमारांच्या मत्स्यव्यवसाय संबंधित मागण्या आणि सेवांची माहिती देण्याचे काम सागरमित्र करतील. स्थानिक मच्छीमारांमध्ये विविध सरकारी योजना आणि कार्यक्रमांबाबत जनजागृती करणे, प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेत सहभागी होण्यासाठी लाभार्थींना प्रोत्साहन देणे, मत्स्योत्पादन संकलनाचे काम पाहणे, मत्स्योत्पादन, मत्स्य किमती इ. माहितीचे संकलन करणे, मच्छीमारांना प्रशिक्षण आणि क्षमता वाढीसाठी गतिशील करणे यांसारखी कामे सागरमित्र करणार आहेत.

सागरमित्र पदासाठी शैक्षणिक पात्रता ही कमीत कमी बारावी विज्ञान उत्तीर्ण अनिवार्य आहे.

ज्या उमेदवाराचे शैक्षणिक पात्रता जास्त असेल, त्यास प्राधान्य दिले जाईल. मत्स्यविज्ञान पदविका उत्तीर्ण उमेदवार हा बारावी विज्ञान शाखा उत्तीर्ण समकक्ष ग्राह्य धरण्यात येईल. त्या उमेदवारासही प्राधान्य देण्यात येईल. अर्जदारांचे वय १८ ते ३५ वर्षदरम्यान असावे.

स्थानिक किनारपट्टीवरील मच्छीमार गावातील उमेदवारांना आणि महिलांना प्राधान्य देण्यात येणार आहे. उमेदवाराला संगणक आणि सांख्यिकी माहितीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

उमेदवाराची नेमणूक फक्त गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल. सागरमित्रासाठी प्रति महिना १५ हजार रुपये एकसमान प्रोत्साहन/मानधन देण्यात येईल. नियुक्त केलेल्या तात्पुरत्या स्वरूपातील उमेदवारास नियमित कर्मचाऱ्याप्रमाणे नियम, अटी व शर्ती लागू राहणार नाहीत, असे या वेळी सांगण्यात आले आहे. जास्तीत जास्त उमेदवारांनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पर्यटन विकासासाठी पायाभूत सुविधांचा विकास महत्त्वाचा

**सातारा : प्रतिनिधी**

पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी पायाभूत सुविधांचा विकास महत्त्वाचा आहे. त्यासाठी तापोळा आणि बामणोली परिसरातील रस्त्यांचा मोठ्या प्रमाणावर विकास करण्यात येत आहे. लवकरच कोकणाला पश्चिम महाराष्ट्राशी जोडणाऱ्या बामणोली-दरे पुलाचे काम सुरू होणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

महाबळेश्वर येथील तापोळा-महाबळेश्वर रस्त्याचे मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते भूमिपूजन झाले त्या वेळी ते होते. या वेळी पालकमंत्री



### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन

शंभूराज देसाई, खासदार श्रीकांत शिंदे, खासदार श्रीनिवास पाटील, आमदार मकरंद पाटील, जिल्हाधिकारी रूचेश जयवंशी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिल्लारी, पोलीस अधीक्षक समीर शेख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अधीक्षक अभियंता संतोष रोकडे आदी उपस्थित होते.

तापोळा ते महाबळेश्वर रस्ता अरुंद असल्याने वाहनचालकांना अनेक अडचणी येत असल्याचे सांगून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आता हा रस्ता रुंद आणि मजबूत करण्यात येत आहे. त्यामुळे महाबळेश्वरमध्ये येणारा प्रत्येक पर्यटक तापोळा भागात येईल. लोकांनीही पर्यटनाच्या दृष्टीने व्यवसाय वाढवावा. तापोळा, बामणोलीचा हा परिसर निसर्गसंपन्न आहे. याचा विकास करणे हा मुख्य उद्देश असल्याचेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

# हिवताप दिनानिमित्त नवी मुंबईत विविध उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक हिवताप दिन २०२३करिता जाहीर करण्यात आलेल्या हिवतापाला झिरो करू, माझ्यापासून सुरुवात करू या घोषवाक्यास अनुसरून पालिकेच्या २३ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यक्षेत्रांतर्गत प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी हिवतापासंबंधी व्यापक जनजागृती करण्यात आली. प्रभात फेरीमध्ये एएनएम, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी, आशावर्कर व रासायनिक धुरीकरण आणि फवारणी कामगारांचा सहभाग होता.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यक्षेत्रामध्ये प्रदर्शने व



शिबिरांचे आयोजन करण्यात आले. शिबिरामध्ये नागरिकांना हिवतापाच्या प्रसाराबाबत प्रदर्शन संचाद्वारे माहिती देण्यात आली, तसेच डासांच्या अळ्यांचे आणि गप्पी माशांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. या शिबिराचा ३१९२ लाभार्थ्यांनी लाभ घेतला व ३४७ रक्तनमुने घेण्यात आले.

त्याचप्रमाणे हिवताप दिनानिमित्त नागरिकांना हिवतापाच्या लक्षणांविषयी अवगत करण्यात आले. आगामी पावसाळा कालावधी लक्षात घेता नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक नागरिकाने जागरुक राहून आपल्या घरात व घराभोवताली परिसरात पाणी साचून राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, तसेच हिवतापाची लक्षणे आढळल्यास नजीकच्या महानगरपालिका रुग्णालयात जाऊन उपचार करून घ्यावेत आणि महापालिकेमार्फत आपल्या घरी भेटी देणाऱ्या कर्मचाऱ्यास सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त राजेश नार्वेकर यांनी केले आहे.

## वैद्यकीय महाविद्यालयांतील सुरक्षेचे लेखापरीक्षण होणार

**मुंबई : प्रतिनिधी**

वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांना रुग्णांकडून होणारी मारहाण, रुग्णालयांमध्ये घडणाऱ्या आगीच्या घटना या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांतील सुरक्षेचे लेखापरीक्षण (ऑडिट) करण्याचा निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने घेतला आहे.

वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय परिसर, तेथील अग्निसुरक्षा यंत्रणा तसेच रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर इमारतीचे त्रयस्थ संस्थेमार्फत लेखापरीक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन यांनी नुकतीच बैठक घेतली. या बैठकीमध्ये वैद्यकीय महाविद्यालयातील सुरक्षेच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. या घटनांची दखल घेत वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांतील सुरक्षेचे लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. महाविद्यालयातील प्रत्येक भागाचे सर्वेक्षण करण्यात येणार असून, ज्या भागांमध्ये सुरक्षा रक्षक कमी आहेत, तेथे सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

## वाहतूक पोलिसांची कारवाई

**अलिबाग** : वाहतूक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि. २५) नियमभंग करणाऱ्या एकूण ६६१ जणांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून ४,६५,७०० रु. इतका दंड आकारला आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated Cost | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-11/23-24/ **RFx No. 7000026992** | Supply of various consumables items at 400 KV R.S. Nagothane s/s under 400 KV R.S. O&M Division, Nagothane... **2nd Call...** | Rs. 3,27,664/- | 25.04.2023 up to 23:59 Hrs. |

**EMD**: Rs. 5,000/- **Tender Fee:** Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** Mitesh Goyal (DY. EE) Mob No. 9461456635
e-mail ID: **ee7230@mahatransco.in**
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**EXTENSION TO E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & Registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000027084** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-20/2023-2024. Extension to RFx E-Tender for Work of Surveillance of MMR Region EHV connected lines for attending any abnormalities during high demand crunch period to occur in upcoming April - May 2023 under EHV Lines S/Dn., Panvel under EHV (O&M) Division Panvel. **Tender Amount:** Rs. 15,11,962/- **EMD:** Rs.15,119/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 27.04.2023, 17:00 Hrs to 07.05.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 07.05.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 08.04.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-27465410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

# पेंधर-बेलापूर मेट्रो विद्यार्थ्यांना ठरणार फायदेशीर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पेंधर-बेलापूर मार्गावर पुढील काही दिवसांत नवी मुंबई मेट्रो सुरू होणार आहे. या मार्गावर असलेले बेलपाडा हे स्थानक विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. हे स्थानक भारती विद्यापीठाच्या प्रवेशद्वाराजवळ आहे. त्यामुळे या विद्यापीठात मुंबई, ठाणे, पनवेलसह इतर शहरांतून हार्बर रेल्वेमार्गे खारघर स्थानकातून येणाऱ्या हजारो विद्यार्थी, शिक्षक व परिसरातील नागरिकांसाठी हे स्थानक प्रवासातील दुवा ठरणार आहे.

बेलपाडा या स्थानकाच्या परिसरात भारती विद्यापीठ आहे. येथे १० हजारांहून

### स्कायवॉकची उभारणी

***बेलपाडा मेट्रोस्थानकावरून खारघर रेल्वे स्थानकावर सहज जाता यावे, यासाठी सिडको येथे ३०० मीटर लांबीचा स्कायवॉक उभारणार आहे. त्यामुळे भविष्यात या स्थानकाला महत्त्व येणार आहे.***

अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या मेट्रो स्थानकावरून विद्यापीठाकडे जाणाऱ्या दिशेला लिफ्टची सोय असल्याने विद्यार्थीवर्गाला मोठा दिलासा मिळेल. या विद्यापीठात येणारे विद्यार्थी प्रामुख्याने हार्बर मार्गावरील खारघर स्थानकातून प्रवास करतात. त्यांच्यासाठी बेलपाडा ते खारघर रेल्वे स्थानक हा प्रवास अधिक सुखकर होणार आहे. त्यासोबतच बेलपाडागाव आणि सेक्टर तीन आणि चार वसाहतीमधील प्रवाशांसाठीही हे स्थानक सोयीचे होणार आहे.

बेलपाडा मेट्रो स्थानकापासून पाच मिनिटाच्या अंतरावर हार्बर मार्गावरील खारघर रेल्वेस्थानक आहे. तळोजा वसाहत, आद्योगिक वसाहत तसेच खारघर सेक्टर ४० ते १२मधील प्रवासी खारघर रेल्वेस्थानक गाठण्यासाठी आरामदायी प्रवास करीत बेलपाडा मेट्रो स्थानकावरून खारघर रेल्वे स्थानक गाठू शकतात.



## निवडक

### खैरणे येथे एकाची आत्महत्या

**पनवेल :** मानसिक तणावातून एका व्यक्तीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पनवेल तालुक्यातील खैरणे गावाच्या एका चाळीत घडली आहे. खैरणे गावाच्या एका चाळीत राहणारे रुपला रेख्या राठोड (वय ४२) याच्यावर गेल्या काही दिवसापासून मानसिक उपचार सुरू होते. त्याच्या नैराश्यातून व आजाराच्या तणावातून या व्यक्तीने राहत्या घरातील छताला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या घटनेची नोंद तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. शहर पोलीस या व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध घेत आहे. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ३२ ते ३५ वर्षे असून त्याचा चेहरा उभट, बारीक दाढी, डोक्याचे केस बारीक काळे आहे. तसेच त्याच्या डाव्या हातावर साप, फुल, ओम, त्रिशुल, विंचू असे गोंदलेले आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार सचिन जाधव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मुलीच्या विनयभंगप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल :** अल्पवयीन मुलीला व्हिडीओ कॉल करून शरीराचे अश्लील भाग दाखवले व शारीरिक सुखाची मागणी केल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ वर्षीय तरुणीच्या इन्स्टा आयडी अकाउंटवर राणी राठोड २००० या इन्स्टा आयडीवरून मैत्रिणीचा फोटो पाठवला व तिची मैत्रीण असल्याचे भासवून व्हिडीओ कॉल करण्यास भाग पाडले. व्हिडीओ कॉल सुरू केल्यावर शरीराचे अश्लील भाग दाखवून शारीरिक सुखाची मागणी केली व या व्हिडीओचा स्क्रीनशॉट काढून पीडित तरुणीच्या इतर मित्र-मैत्रिणींचे इंस्टाग्राम अकाउंटवर व्हायरल केला. याबाबत गुन्हा दाखल झाला असून याप्रकरणी तळोजा पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# गप्पी मासे पाळा, हिवताप टाळा!

## पनवेल मनपातर्फे हिवताप दिनानिमित्त रॅली

### आरोग्य केंद्रांकडून जनजागृती

**पनवेल : प्रतिनिधी**

जागतिक हिवताप दिन २५ एप्रिल रोजी साजरा केला जातो. या निमित्ताने पनवेल महापालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वतीने बुधवारी (दि. २६) रॅली काढण्यात आली. या वेळी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच महापालिका मुख्यालयात हिवताप होऊ नये याची काळजी घेण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. रॅलीदरम्यान नागरिकांना हिवताप जनजागृती विषयक माहितीपत्रकाचे वाटप करण्यात आले.



एप्रिल महिना हा किटकजन्य आजारांच्या जन जागरणाचा आणि नियोजनाचा महिना म्हणून साजरा केला जातो. तसेच २५ एप्रिल २०२३ जागतिक हिवताप दिनानिमित्ताने डासांच्या नियंत्रणासाठी डेंगू व मलेरियाजन्य आजार होऊ नये यासाठी मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या सूचनेनूसार सर्व नागरी आरोग्य केंद्राच्या परिसरात तेथील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका, अधिपरिचारिका, बहुद्देशीय आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर्स यांनी रॅली काढली.

या वेळी 'डंक छोटा आजार मोठा, 'येता कणकण तापाची करा तपासणी रक्ताची, 'मच्छरदाणीचा वापर करा किटकजन्य आजारांना दूर करा, गप्पी मासे यांची टोळी करी डास अळ्यांची होळी अशा घोषणा लिहलेले फलक या रॅलीत प्रदर्शित करण्यात आले होते.

**मुख्यालयात प्रतिज्ञा**

*या वेळी सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच महापालिका मुख्यालयात हिवताप होऊ नये याची काळजी घेण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. या वेळी मुख्यालयात मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, वैद्यकीय अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.*

**प्रतिबंधात्मक उपाय**

घरगुती वापरातील पाण्याचे हौद, टाक्या, बॅरल, रांजण आठवड्यातून किमान एकदा पुसून कोरडे करावेत. त्यांना घट्ट झाकणे बसवावीत, ती कापडाने बांधावीत. डबकी बुजवावीत. पाणी वाहते करावे. साठलेल्या पाण्यात गप्पी मासे सोडावेत. घरातील भंगार सामान, निरुपयोगी टायर्सची विल्हेवाट लावावी. डास प्रतिबंधात्मक साधनांचा वापर करावा.

**'या' ठिकाणी डासांची पैदास**

अॅनाफिलिस डासअॅनाफिलिस डासांमुळे हिवतापाचा प्रसार होतो. हे डास स्वच्छ पाण्यात तयार होतात. उदा. पाण्याच्या टाक्या, डबके, छतावरील पाणी इत्यादी. हे डास घरगुती पाण्यात तयार होतात. तुंबलेली गटारे, ड्रेनेज लाईन, अस्वच्छ पाण्यात तयार होतात.

## सोमटणे गावाजवळ लाकडी गोदामाला आग



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील सोमटणे गावाच्या हद्दीत असलेल्या एका लाकडाच्या गोदामाला बुधवारी (दि. २६) सकाळी भीषण आग लागल्याची घटना समोर आली होती. या आगीत मोठ्या प्रमाणात सामान जळून खाक झाल्याने हजारोंचे नुकसान झाले.

पनवेल तालुक्यातील सोमटणे गावाच्या हद्दीत एका लाकडाच्या गोदामाला बुधवारी सकाळी आग लागली. या आगीमध्ये मोठ्या प्रमाणात सामान जळून खाक झाले आहे. या घटनेची माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे निरीक्षक जगदीश शेळकर, महिला सहाय्यक निरीक्षक अंबिका अंधारे, उपनिरीक्षक गुटाळ, हवालदार अमोल कांबळे, अमर भालसिंग व पथक घटनास्थळी रवाना झाले. व तातडीने त्यांनी तीन अग्निशमन गाड्या घटनास्थळी पाचारण केले. त्यांनतर अथक प्रयत्नाने आग नियंत्रणात आली. ही आग कोणत्या कारणामुळे लागली याचा तपास पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.



## कर्नाळा खिंडीत कारचा अपघात

**पनवेल : वार्ताहर**

चालत्या गाडीचे टायर फुटल्याचा आवाज आल्याने कारचालकाने हडबडून डिव्हायडरला धडक दिल्याची घटना पनवेलमधील कर्नाळा खिंडीत घडली आहे. सुदैवाने या धडकेत कोणालाही इजा झाली नाही, मात्र कारचे मोठे नुकसान झाले आहे.

मुंबई येथील रहिवाशी मनोहर दामाजी सावंत (वय ६३) हे आपल्या पत्नी मनिषा सावंत (वय ६०), नाती पूर्वा रूपेश साळवी (नऊ वर्ष) व प्रिशा रूपेश साळवी (पाच वर्ष) यांच्यासोबत रेनॉल्ट किगर गाडीने (क्र. २२ बीएच ७३५४ सी) रत्नागीरी येथे जाण्यासाठी निघाले असता प्रवासादरम्यान त्यांची गाडी कर्नाळा खिंडीत आल्यावर त्यांना अचानक गाडीचे टायर फुटल्याचा आवाज आला. यामुळे हडबडून गेलेल्या मनोहर सावंत यांचे वाहनावरील नियंत्रण सुटून गाडीची डिव्हायडरच्या डाव्या बाजूस धडक बसली.

सुदैवाने या धडकेत कोणालाही इजा झाली नाही मात्र कारचे मोठे नुकसान झाले आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

या बाबत अधिक तपास पोलीस हवालदार भीमाशंकर होळगीर करीत आहेत.

## खारघरमधील रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये विविध मार्गदर्शन सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात २४ ते २८ एप्रिलदरम्यान महाविद्यालयात वर्कशॉप व सेमिनार समिती व अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय पातळीवर फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे आयोजन केले आहे. बुधवारी (दि. २६) या पाच दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम अंतर्गत तीन सत्रांचे आयोजन केले होते.



बुधवारी प्रथम सत्राचे आयोजन पोस्ट डॉक्टरेल संशोधन या विषयावरती केले होते. या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. बळीराम गायकवाड (प्राचार्य, कोकण ज्ञानपीठ कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स, उरण) यांनी सहभागी प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. तसेच त्याच दिवशी संदर्भ व सायटेशन या विषयावरती द्वितीय सत्राचे आयोजन केले होते. या सत्रासाठी व्याख्याते म्हणून डॉ. संदीप पोंडे यांनी सहभागी प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. तसेच डेटा अनालिसिस या विषयावरती तिसऱ्या सत्राचे आयोजन केले होते. या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. रोशन काझी यांनी सर्व सहभागी प्राध्यापकांना मार्गदर्शन केले.

या तिन्हीही सत्रांचा लाभ रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील तसेच इतर मुंबई विद्यापीठात संलग्नित व स्वायत्त महाविद्यालयातील सुमारे ४५ प्राध्यापकांनी घेतला. प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी प्रमुख वक्त्यांचे महाविद्यालयाच्या वतीने स्वागत केले तसेच उपस्थित प्राध्यापकांना संशोधनाबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले व पुढील दोन दिवसासांठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व प्रा. महेश्वरी झिरपे (समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष) हे सर्व उपस्थित होते. या दोन्ही सत्रांमध्ये प्रमुख वक्त्यांची ओळख व सूत्रसंचालन प्रा. सफिना मुकादम व प्रा. नम्रता पारिक केले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानले.



**पनवेल : जांभिवली ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने दिव्यांग व्यक्तींना घरघंटीचे वाटप करण्यात आले. या वेळी सरपंच रिया रवींद्र कोंडीलकर, उपसरपंच अनिता अनंत कोंडीलकर, सदस्य शेखर धर्मराज जाधव, अमित गोविंद कोंडीलकर, ग्रामसेविका अर्चना संतोष देशमुख आदी उपस्थित होते.**

## रेल्वे प्रवासात मोबाईलची चोरी

**पनवेल : वार्ताहर**


रेल्वे प्रवासात सीटवर झोपणाऱ्या प्रवाशांवर चोरट्यांनी लक्ष केंद्रित केले असून पनवेल हार्बर मार्गावर लोकल रेल्वेत सीटवर झोपलेल्या तीन प्रवाशांचे मोबाईल पळवून नेले आहे. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विचुंबे येथील राजेशकुमार मीना यांचा ३३ हजार रुपयांचा मोबाइल, गोपाळ शर्मा यांचा ११ हजार रुपयांचा मोबाइल व पनेवलमधीलच रोशन मंडल यांच्याकडील मोबाइलही लोकलमधील प्रवासात चोरीला गेला आहे. पनवेल हार्बर लोकल रल्वेत सीटवर झोप लागलेली असताना चोरट्यांनी या तिघांचे मोबाईल पळवून नेले. याविषयी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाला आहे.

दरम्यान, रेल्वेमधील चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून प्रवासात आपल्या वस्तूंची काळजी घेण्याचे आवाहन रेल्वे पोलिसांच्या वतीने करण्यात येते.

## सिमेंट मिक्सरची कंटेनरला धडक; दोन्ही वाहनांचे नुकसान

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील शिरढोण गावाच्या हद्दीत बुधवारी (दि. २६) सकाळच्यादरम्यान सिमेंट मिक्सर आणि कंटेनरच्या विचित्र अपघात झाला. या धडकेत दोन्ही वाहनांचे प्रचंड नुकसान झाले आहे, मात्र सुदैवाने जीवितनाही झाली नसल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.



मुंबई-गोवा महामार्गावर चालू असलेल्या कॉंक्रिटीकरणामुळे काही ठिकाणी एकेरी वाहतूक सुरू आहे. याचा त्रास वाहनचालकांना होत असून समोरासमोरून येणाऱ्या वाहनांमुळे छोटे-मोठे अपघात होत आहे. याच पद्धतीने शिरढोण गावाच्या हद्दीत एकेरी वाहतुक असलेल्या साई प्रोव्हीसो काउंटी सोसायटीच्या समोर बुधवारी सकाळच्या सुमारास पेणहुन पनवेलकडे जेएसडब्ल्यू जाणाऱ्या सिमेंट मिक्सरने (एमएच ४६ एफ ५५४८) समोरून येणाऱ्या कंटेनरला (एमएच ४६ एच ४५०४) ला धडक दिली. या धडकेत दोन्ही वाहनांचे प्रचंड नुकसान झाले आहे, मात्र सुदैवाने जीवितनाही झाली नसल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

## पनवेलमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा





**पनवेल : प्रतिनिधी**

विभागीय आयुक्त कोकण विभाग संचलित रायगड जिल्हा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र 'गरुड झेप' मार्फत एमपीएससी गट 'ब' व गट 'क' संयुक्त पूर्व परीक्षा ३० एप्रिलकरिता २६, २७ व २८ एप्रिल असे तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर व जिल्हाधिकारी योगेश म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे करण्यात आले आहे. या शिबिरात पनवेल, कर्जत, उरण, खालापूर व पेण या पाच तालुक्यातील परिक्षार्थी सहभागी झाले आहेत. बुधवारी (दि. २६) सकाळी १० वाजता या मार्गदर्शन शिबिराला सुरुवात झाली. या वेळी पनवेल उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके, कर्जत उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, पनवेल तहसीलदार विजय तळेकर, खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांच्यासह सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग, विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी पनवेल तहसीलदार विजय तळेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना कोकण विभागीय महसूल आयुक्त महेंद्र कल्याणकर यांनी रायगड जिल्ह्यात गरुडझेप या नावाने स्पर्धा परिक्षा केंद्र सुरू केले होते.

या धर्तीवर रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील १५ तालुक्यात स्पर्धा परीक्षा केंद्राची वाटचाल उत्तम प्रकारे सुरू असल्याचे प्रतिपादन केले. बुधवारी (दि. २६) नवनाथ वाघ यांचे सकाळी १० ते १ वाजेपर्यंत 'चालू घडामोडी' याविषयावर मार्गदर्शन झाले. दुपारी १ ते २ यावेळेत जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत अजित गायकवाड यांचे 'अर्थशास्त्र' या विषयावर मार्गदर्शन झाले.

**आज, उद्याही शिबिर**

*गुरुवारी (दि. २७) महेश शिंदे यांचे सकाळी १० ते १ वाजेपर्यंत 'एमसीक्यू सॉल्व्हिंग टेक्निक्स' आणि 'परीक्षेच्या दिवसाचे नियोजन', दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत श्रीकांत जाधव यांचे 'भूगोल' विषयावर मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच २८ एप्रिल रोजी नंदकुमार पाटील यांचे सकाळी १० ते १ वाजेपर्यंत 'इतिहास-समाजसुधारक' व दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत लक्ष्मण नखाते यांचे 'विज्ञान' या विषयावर मार्गदर्शन लाभणार आहे.*

## शिकवणे ही सर्वांत मोठी कला





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षक हा जगातील सर्वांत मोठा कलाकार आहे, तर शिकवणे ही विश्वातील सर्वांत मोठी कला आहे. मानवी मन आणि आत्मा हे माध्यम असल्यामुळे शिकवणे ही सर्वांत मोठी कला आहे असे विचार रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत यांनी तु. ह. वाजेकर विद्यालय फुंडेच्या मुख्याध्यापिका सुनीता गणेश वर्तक व ग्रंथपाल दिलीप अनंत घरत यांच्या सेवानिवृत्ती समारंभावेळी व्यक्त केले.

### भाजप नेते सुधीर घरत यांचे प्रतिपादन

सेवापुर्ती सत्कार समारंभ वेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना सुधीर घरत यांनी शिक्षक हे समाजातील असे व्यतिमत्व आहे जे फक्त समाजाला देण्याचे काम करतात, घेण्याचे नाही. समाज घडविण्याचा काम शिक्षक करत असतात. ३५ वर्ष रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून कर्मवीरांना अभिप्रेत असलेल काम सुनीता वर्तक यांनी केले आहे, असे गौरवोद्गार त्यांनी या वेळी काढले.

या समारंभास सहाय्यक विभागीय अधिकारी एस. एस. फडतरे, स्कूल कामिनी चेअरमन कृष्णा जी. कडू, माजी पं. स. सदस्य नरेश घरत, दीपक ठाकूर, स्कूल कमिटी सदस्य उमेश म्हारे, राजेश ठाकूर, रमाकांत म्हात्रे, दिलीप तांडेल, योगेश पाटील, श्री. तुमडे, प्राध्यापकवर्ग व इतर होते. प्रास्ताविक श्री. कुटे व सूत्रसंचालन दर्शना माळी यांनी केले.


## संपादकीय

# विरोधकांचे स्वप्नरंजन

गेले काही दिवस महाराष्ट्रातील राजकारण 'कौन बनेगा मुख्यमंत्री' या नव्या प्रयोगाने ढवळून निघाले आहे. अर्थात या नव्या नाट्यप्रयोगामध्ये नवीन असे काही नाही. किंवा, त्या नाट्यकल्पनेला वास्तवाचादेखील काही आधार नाही. महाराष्ट्रातील मतदारांनी आपले मनोरंजन तेवढे करून घेतले असेल.

**गेले काही दिवस महाराष्ट्राला नवा मुख्यमंत्री लाभणार अशी आवई विरोधकांकडून उठवली जात होती. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल कुठल्याही क्षणी येईल आणि तो येताच शिंदे सरकार पडेल, अशा प्रकारचे हे स्वप्नरंजन होते. शिंदे-फडणवीस सरकार हे केवळ काही तासांचेच सोबती आहे, असे भाकित छातीठोकपणे माजी पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी गेल्या महिन्यातच ठाण्यात केले होते. असे काहीबाही बोलून त्यांनी आपले हसे तेवढे करून घेतले. ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांचा सकाळचा मॅटिनी शो रोज नवनव्या आवयांना किंवा अफवांना जन्म देणारा ठरत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार लवकरच भारतीय जनता पक्षाशी हातमिळवणी करणार अशीही चर्चा राजकीय वर्तुळात होती. ठाकरे गटाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी उलटसुलट विधाने करून त्यात भरच घातली. इतकेच नव्हे तर पक्षाच्या मुखपत्रामध्ये रोखठोक लेख लिहून अजित पवार यांच्याबद्दलच्या अफवेवर शिक्कामोर्तबच केले. खुद्द अजित पवार यांनी वारंवार खुलासे करूनही त्यांच्याबद्दलची चर्चा अद्याप थांबलेली नाही. विशेष म्हणजे ज्या भाजपशी संधान बांधण्याचा प्रयत्न अजित पवार करत आहेत असे म्हटले जाते, त्या भाजपमधील एकाही नेत्याने त्याला ना कधी दुजोरा दिला, ना कधी चर्चेला खतपाणी घातले. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राजीनामा तयार ठेवण्यास सांगण्यात आले आहे अशी जोरदार चर्चाही राजकीय वर्तुळात सुरू झाली होती. मुख्यमंत्री शिंदे दोन-तीन दिवसांसाठी साताऱ्याजवळील आपल्या गावी सुटीवर गेले, त्याचीही प्रचंड चर्चा करण्यात आली. विशेष म्हणजे सत्तेवर असताना ज्या पक्षाचे मुख्यमंत्री अडीच वर्षे घराबाहेर देखील पडले नव्हते, त्यांच्याच नेत्यांनी मुख्यमंत्री नॉट रिचेबल असल्याची आवई उठवणे हा एक विनोदच म्हणायला हवा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदेच कायम राहतील आणि आगामी निवडणुकांमध्ये त्यांच्याच नेतृत्वाखाली निवडणुका लढवल्या जातील, अशी ग्वाही स्वच्छ शब्दांत दिली. त्यामुळे तरी आता ही चर्चा थांबावी. गेले काही दिवस गावोगाव विविध पक्षांकडून प्रचंड प्रमाणात बॅनरबाजी सुरू आहे. आपापल्या पक्षाच्या लाडक्या नेत्याचे होर्डिंग लावून त्यावर महाराष्ट्राचे भावी मुख्यमंत्री असा उल्लेख करण्याचे प्रकार पुणे, नागपूर आणि काही प्रमाणात मुंबईत दिसून आले. अर्थात यामागे कार्यकर्त्यांचा अतिउत्साह होता हे वेगळे सांगायची गरज नाही. प्रत्येक पक्षाला आपला ज्येष्ठ नेता कधी ना कधी मुख्यमंत्री व्हावा असे वाटते. किंवा, मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न बघण्यातही काहीच गैर नाही. मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे विराजमान झाल्यानंतर भाजपमधील अनेक कार्यकर्ते काहिसे अस्वस्थ झाले होते हे खरे कारण त्यांना देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्रीपदी हवे होते. राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनादेखील अजित पवार यांना मुख्यमंत्रीपदी बसलेले बघायला आवडेल, परंतु कार्यकर्त्यांच्या आवडी निवडीपेक्षा निवडणुकीतील गणिते अधिक महत्त्वाची ठरतात. शिंदे-फडणवीस सरकार सध्या गतिमान कारभार करीत आहे. यात विघ्न आणण्याचे स्वप्न विरोधकांनी पाहू नये.**

# उष्माघातापासून बचावासाठी शासनाच्या उपाययोजना



(संग्रहित छायाचित्र)

रायगड जिल्हा उष्माघात प्रवण आहे. त्यानुषंगाने १ मार्च ते १५ जून या कालावधीत आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत सर्व कार्यकारी यंत्रणामध्ये समन्वय राहण्यासाठी उन्हाळी हंगामातील उष्मलाटेमुळे उद्भवणाऱ्या उष्माघाताने मानव, पशु-प्राणी व शेती पिकांवर होणारे दुष्परिणाम टाळण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर विविध विभागांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रायगड डॉ. योगेश म्हसे यांनी सर्व शासकीय विभागांना आदेशित केले आहे.

रायगड जिल्हा उष्मालाट प्रवण क्षेत्र म्हणून ओळखला जातो. त्यामुळेच उष्माघात उपाययोजनांसाठी स्थानिक स्तरावर करावयाच्या नियोजनाविषयी सूचना देण्यात आलेल्या आहेत, तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, नगरपालिका, जिल्हाधिकारी मंडळ, रेल्वे प्रशासन, शिक्षण विभाग, रस्ते परिवहन विभाग, एमआरईजीएस, पशु संवर्धन, वन विभाग, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा नियोजन अधिकारी, कृषी विभाग, पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम या विभागांनी उष्माघाताचे परिणाम कमी करण्यासाठी अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीचे आराखडे तयार करण्याबाबत सूचविले आहे. उष्णतेची लाट अथवा उष्माघाताचा विचार करताना तापमानाव्यतिरिक्त हवेतील आर्द्रता, धुळीचे कण, हवेचे प्रदूषण या बाबीसुद्धा विचारात घेऊन जिल्ह्यातील भौगोलिक व वातावरणीय बाबींचा विचार करून याबाबतचे नियोजन करणे आवश्यक आहे.

वातावरणातील तापमानासोबत हवेतील आर्द्रता जास्त असल्यास त्याठिकाणी उष्णतेच्या लाटेचे अधिक दुष्परिणाम जाणवतात हे अभ्यासाअंती सिद्ध झाले आहे. याशिवाय काही भागात रात्रीच्या वेळी तापमान कमी न होता अधिक उष्ण राहत असल्याने तो भाग अतिसंवेदनशील व उष्माघातप्रवण बनतो. अशा परिस्थितीत मानवी शरीरावर उष्णतेचे जास्त परिणाम दिसून येतो. रायगड जिल्हा उष्माघात प्रवण असल्याने व आपत्ती या सदरात येत असल्याने जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड डॉ. योगेश म्हसे यांनी विविध विभागांना जबाबदाऱ्या पार पाडण्याबाबत आदेश जारी केला आहे.

सिमेंट रस्त्यांना पर्यायी विचार करणे, नाले व गटारे सुस्थितीत ठेवण्यासाठी उपाययोजना करणे, प्रत्येक घराच्या छतावर पांढऱ्या रंगाचे आवरण करणे अथवा पांढरे आच्छादन करावे, पिण्याच्या पाण्याच्या टाक्या पांढऱ्या रंगाच्या असाव्यात, बागांमध्ये तसेच सार्वजनिक जागेमध्ये अधिकाधिक झाडांची लागवड करणे, विहिरी सुस्थितीत ठेवणे, घरे बांधणारे कारागीर बिल्डरांना तांत्रिक उष्मा लाट अनुरूप इमारती विषयक प्रशिक्षण देणे, जिल्ह्यात कार्यरत असणाऱ्या सेवाभावी संस्था, विद्यार्थ्यांमध्ये उष्ण लाटेविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आराखडा तयार करणे, रस्त्यावर फिरते विक्रेत्यांसाठी सावलीची ठिकाणे निश्चित करणे, सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये सोलर एनर्जीवर चालतील यासाठी उपाययोजना करणे तसेच खाजगी आस्थापना व घरे यांना सोलर एनजीच्या वापराविषयी चालना देणारे उपक्रम हाती घेणे, रुफ वॉटर हार्वेस्टिंग, कुपनलिका पुनर्भरण, विहिरी पुनर्भरण करणे, तलावातील गाळ आदी कामे नागरी सहभागातून करणे अशा प्रकारच्या उपाययोजना करण्यात येणार आहेत.

उष्णलाट व्यवस्थापन कालावधी हा सर्वसाधारणपणे दरवर्षी १ मार्च ते १५ जून असा राहील. नागरिकांच्या सहाय्यासाठी तसेच आपत्कालीन परिस्थितीमध्ये हे संपर्क क्रमांक प्रसारित करण्यात यावेत, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक बोलविण्यात यावी, या बैठकीत लघु कृती आराखडा संबंधित विभागाकडून तयार करून घ्यावा. झोपडपट्टी, गर्दीची ठिकाणे, कारखाने व तत्सम व्यवसायामध्ये काम करणारे कामगार, धार्मिक स्थळे आदींचा विचार करून त्या ठिकाणी आवश्यक वैद्यकीय सुविधा सर्व आरोग्य केंद्रावर आहे किवा नाही याची खात्री करावी, आरोग्य विषयक बाबीसाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा शल्यचिकीत्सक हे संपर्क अधिकारी (नोडल अधिकारी) म्हणून काम करतील व ते जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याशी सातत्याने संपर्कात राहून आरोग्य सेवेविषयी प्रत्येक उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, कुटीर रुग्णालय, जिल्हा रुग्णालयातील सर्व आरोग्याविषयी सोईसुविधा पूर्ण वेळ उपलब्ध राहतील याची खात्री करतील.

भारतीय हवामान विभागाकडून उष्णतेच्या लाटेसंदर्भात पूर्वसूचना देण्यात येतात. यासंबंधीची अद्ययावत माहिती प्राप्त करण्यासाठी व संकलित करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याचे हवामान खात्याशी संबंधित जिल्हा प्रादेशिक अधिकारी अथवा जिल्हा प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकारी दररोज खचऊ कडून माहिती घेऊन जिल्हाधिकाऱ्यांना अवगत करतील. हवामान विभागाकडून उष्णतेच्या लाटेची पूर्वसूचना येताच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रेस नोट स्थानिक दूरचित्रवाणी वाहिन्या, रेडिओ सोशल मिडीया, सचतप्रणाली ध्वनीक्षेपक इत्यादीच्या माध्यमातून नागरिकांना सूचना व इशारा देणे.

सर्व शासकीय रुग्णालयात उष्माघातामुळे रुग्णांसाठी स्वतंत्र रजिस्टर ठेवावे. त्यात उष्माघातामुळे उपचारासाठी दाखल होणाऱ्या रुग्णांची व उष्माघातामुळे मृत्यू होणाऱ्या व्यक्तीची सविस्तर नोंद करून जिल्हाधिकारी यांना अहवाल सादर करावा. उष्माघातामुळे कोणत्याही व्यक्तीचा खासगी रुग्णालयात मृत्यू झाल्यास वरील निकष तपासून मृत्यूचे कारण अचूक नोंद करावी.

उष्माघाताचे लक्षणे : चक्कर येणे, उलटी व मळमळ होणे, शरीराचे तापमान खूप वाढणे, पोटात कळा येणे, शरीरातील पाणी कमी होणे,

उष्णतेपासून बचाव करण्यासाठी काय करावे : जास्तीत जास्त पाणी प्यावे, हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत, बाहेर जाताना गॉगल्स, छत्री, टोपी, बूट व चपलांचा वापर करावा, प्रवास करतांना पिण्याचे पाणी सोबत ठेवावे, उन्हात काम करीत असलेल्या कामगारांनी व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा पांढरा रुमाल बांधावा किंवा छत्रीचा वापर करावा, तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावा, शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस घ्यावे, लस्सी, ताक, कैरीचे पन्हे, लिंबू पाणी इत्यादींचा नियमित वापर करण्यात यावा, अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम आदी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. गुरांना पाळीव प्राण्यांना छावणीत ठेवण्यात यावे, तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे. घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा, रात्री खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्यात, पंखे ओले कपडे यांचा वापर करण्यात यावा, तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करण्यात यावे, कामाच्या ठिकाणी कामगारांसाठी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, सूर्य प्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सूचित करण्यांत यावे, पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा, बाहेर उन्हात काम करीत असतांना थोड्या थोड्या अंतराने विश्रांती घ्यावी, रस्त्याच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरीता शेड उभारावेत, जागोजागी पाणपोईची सुविधा करण्यात यावी, क्रॉक्रीट घरांच्या छतावर पांढरा रंग द्यावा, टीन पत्र्यांचे छतावर गवताची पेंढी, धान्याचा कडवा यांचे आच्छादन करावे, छतावरील पाणी साठवण्याच्या प्लास्टिक टाक्या गोणपाटाच्या सहाय्याने झाकाव्यात.

**-जिल्हा माहिती कार्यालय, अलिबाग-रायगड**

## बदलते तंत्रज्ञान

# आता तुमचे चॅट होणार अधिक सुरक्षित




गेल्या वर्षी ओपनएआयने नोव्हेंबर महिन्यात चॅट जीपीटी हा चॅटबॉट लॉन्च केला आहे. एआय चॅटबॉटने त्याच्या मानवासारखा प्रतिसाद आणि कार्ये पूर्ण करण्याच्या क्षमतेमुळे त्याच्या त्यासाठी त्याच वेगाने लोकप्रियता मिळवली. याचा वापर सध्या अनेक ठिकाणी केला जात आहे. यानंतर डेव्हलपर्सनी जीपीटी-४ लॉन्च केले. हे आधीच्या सिरींजपेक्षा जास्त प्रगत असल्याचे सिद्ध झाले आहे.

तथापि, चॅट जीपीटी वापरकर्त्यांची सेवा करण्याची क्षमता वाढवण्यासाठी तुमचे चॅट्स सेव्ह करते आणि संग्रहित करून ठेवते. ओपन एआयच्या गोपनीयता धोरणानुसार, कंपनी कायदेशीर व्यावसायिक हेतूंसाठी नाव, ईमेल पत्ता आणि देयक तपशील यासारखी वैयक्तिक माहिती गोळा करू शकते. यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत, तसेच लोकांचा एक गट ओपनएआयचे उत्पादन प्रशिक्षित करण्यासाठी ग्राहकांचा डेटा वापरण्याबद्दल वाद घालत आहे. इटली सरकारने चॅट जीपीटी हे 'बेकायदेशीरपणे वापरकर्त्यांचा डेटा गोळा करतो' असा आरोप करत त्यावर बंदी घातली आहे. चॅटजीपीटीने ग्राहकांचा डेटा वापरल्याचा आरोप झाल्यामुळे लोकांमध्ये चिंता निर्माण झाली, मात्र आता कंपनीने वापरकर्त्यांसाठी त्यांची चॅट हिस्ट्री टॉगल करण्याचा पर्याय आणला आहे. हा पर्याय एकदा सुरू केला की, एआय चॅटबॉटसह झालेले तुमचे चॅट्स स्टोअर केले जाणार नाहीत, तर हा पर्याय कसा सुरू करावा याच्या सोप्या स्टेप्स जाणून घेऊया.

१. सर्वात पहिल्यांदा चॅट जीपीटी या वेबसाईटवर क्लिक करा.
२. त्यानंतर तुम्हाला त्या वेबसाईटच्या खालील बाजूस तुम्हाला तुमचा प्रोफाइल फोटो आणि नाव दिसेल.
३. त्यानंतर प्रोफाइल आणि नावाशेजारी तुम्हाला तीन डॉट्स दिसतील. त्यावर कॅलसिक करून सेटिंग्ज हा पर्याय निवडावा.
४. त्यानंतर तुम्हाला एक नवीन पर्याय दिसेल. ज्यामध्ये डेटा कंट्रोल्स असे लिहिलेले दिसेल.
५. चॅटजीपीटीवरील तुमचे चॅट्स चॅटजीपीटीने सेव्ह करायला नको असल्यास चॅट हिस्ट्री आणि ट्रेनिंग हा पर्याय बंद करावा.

# ए ३८० : जगातील सर्वांत मोठे प्रवासी विमान

## विशेष




२००५मध्ये आजच्या दिवशी जगातील सर्वात मोठे प्रवासी विमान, एअरबस ए३८०ने पहिले उड्डाण केले. तेव्हापासून या जहाजाने १९ कोटींहून अधिक लोकांना त्यांच्या गंतव्यस्थानावर नेले आहे. या विमानात एकाच वेळी ४६९ प्रवासी प्रवास करू शकतात. एअरबसच्या म्हणण्यानुसार, जर सर्व सीट इकॉनॉमी क्लासच्या असतील तर त्यात एकाच वेळी ८५३ लोक प्रवास करू शकतात. सिंगापूर एअरलाइन्स या हवाई वाहकाने प्रथमच हे विमान कार्यान्वित केले. या जहाजाने सिंगापूर ते सिडनी हा पहिला आंतरखंडीय प्रवास यशस्वीपणे पूर्ण केला, ज्याचा ग्राहकांवर उत्कृष्ट परिणाम झाला. याव्यतिरिक्त, असे मॉडेल १०,३७० किलोमीटर अंतरावर १५० टन माल वाहून नेऊ शकते. लक्षात घ्या की या प्रकरणात, रिकाम्या विमानाचे वजन २८० टन आहे आणि बोर्डचे जास्तीत जास्त टेक-ऑफ वजन ५६० टनांपर्यंत पोहोचते.

ए ३८०ने स्थानिक वेळेनुसार सकाळी १०.२९ वाजता टूलूस (फ्रान्स) येथील ब्लॅग्नाक विमानतळावरून पहिले उड्डाण केले. पायलट क्लॉड लॅली आणि जॅक रॉस यांनी विमान उडवले. त्यांच्यासोबत क्रूचे इतर चार सदस्य होते. तीन तास ५४ मिनिटांच्या उड्डाणानंतर विमान त्याच विमानतळावर यशस्वीरित्या उतरवण्यात आले. या यशस्वी उड्डाणानंतर विमान कंपन्यांनी विमानाचा वापर करण्यास सुरुवात केली. २५ ऑक्टोबर २००७ रोजी सिंगापूर एअरलाइन्सने प्रथमच प्रवासी विमान म्हणून ए ३८०चा वापर केला. ए ३८० विमान सिंगापूरहून सिडनीसाठी निघाले, ज्याला फ्लाइट क्रमांक ए ३८० देण्यात आला होता.

या मॉडेलचे एक विशिष्ट वैशिष्ट्य म्हणजे किफायतशीर इंधन वापर. या विमानाची उड्डाण श्रेणी १५,४०० किलोमीटर आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, हे लक्ष्य साध्य करण्यासाठी, अभियंत्यांनी मॉडेलसाठी खास तयार केलेल्या मशीनची एक तुकडी ऑर्डर केली. शेवटी इंधनाच्या वापरात घट केवळ विंग आणि फ्यूजलेजच्या आदर्शपणे समायोजित आकारानेच मिळवता येते.

### भारतात पहिले लँडिंग

ए ३८०चा आकार आणि त्यामुळे भारतीय विमान कंपन्यांचे होणारे नुकसान लक्षात घेता, याला भारतात चालवण्याची परवानगी देण्यात आली नाही, परंतु २०१४ मध्ये केंद्र सरकारने ए ३८०ला चार प्रमुख विमानतळांवर उतरण्यास आणि उड्डाण करण्यास परवानगी दिली. देशात दिल्ली, मुंबई, बंगळुरू आणि हैदराबाद ही विमानतळे होती. यानंतर, दिल्लीतील इंदिरा गांधी विमानतळाच्या टर्मिनल ३वर ३० मे २०१४ रोजी प्रथमच ए ३८०चे लँडिंग झाले.

### बंद करण्याचा निर्णय

१४ फेब्रुवारी २०१९ रोजी एअरबसने घोषणा केली की ते २०२१पासून जगातील सर्वात मोठ्या विमानाचे, एअरबस ए ३८०चे उत्पादन थांबवेल. त्यामागे विमानाची किंमत आणि त्याबाबत विमान कंपनीचा भ्रमनिरास हे कारण असल्याचे मानले जात आहे. ए ३८०च्या विमानाची किंमत तीन हजार कोटींहून अधिक आहे. दुबई-आधारित एअरलाइन एमिरेट्सने एअरबसकडून १६२ नवीन विमानांची ऑर्डर कमी करून १२३ केली. इतर विमान कंपन्यांनीही ए३८० न वापरण्याचे जाहीर केले. या कपातीमुळे कंपनीला मोठा झटका बसला.

**-संकलित**


## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : उन्हाळी सुट्ट्यांमध्ये अनेक पालक आपल्या बालकांना घेऊन उद्यान, मैदानात येत असतात. त्यामुळे त्या ठिकाणी बच्चेकंपनीसाठी उंट सफारी असते. या उंटांची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने-आण करताना तन्वी पवार यांनी टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# उष्णतेमुळे सतत तोंड येण्यावर 'हे' उपाय करा



उन्हाळा सुरू होताच तोंड येण्याची अर्थात अल्सरची समस्या वाढू लागते. या वेळी काही खाल्ले किंवा अगदी पाणी पितानाही किंवा बोलतानाही वेदना होतात. यामागे पोटात वाढती उष्णता, मसालेदार आणि आम्लयुक्त अन्नाचे सेवन, निर्जलीकरण, जीवनसत्व बी आणि सी यासारख्या पोषक तत्त्वांची कमतरता ही कारणे आहेत. तोंड येण्याच्या समस्येपासून आराम मिळावा यासाठी आम्ही तुम्हाला काही आयुर्वेदिक उपाय सांगणार आहोत जे तुम्हाला मदत करू शकतात.

* खोबरेल तेल : खोबरेल तेलात दाहकविरोधी गुणधर्म असल्याने ते सूज आणि अस्वस्थता कमी करण्यास मदत करते. तोंडातील अल्सरचे चट्टे कमी करण्यासाठी तुम्ही कापसाचा तुकडा खोबरेल तेलात बुडवून ते प्रभावित भागावर लावा. यामुळे तुम्हाला अल्सरच्या समस्येपासून आराम मिळेल.
* मीठाचे पाणी : मिठाच्या पाण्याचे गुळण्या केल्याने तोंडातील अल्सरचे फोड अथवा चट्टे कमी होतात. मीठ हे संक्रमण बरे करण्यास मदत करते. यासाठी तुम्ही एक ग्लास कोमट पाण्यात एक चमचा मीठ टाका आणि चांगले मिसळून झाल्यावर त्याच्या गुळण्या करा.
* काळे मनुके : तोंडातील लाल वेदनादायी चट्टे कमी करण्यासाठी तुम्हा काळे मनुके सुमारे तीन तास पाण्यात भिजवून ठेवा, रात्री झोपण्यापूर्वी ते खा, यामुळे पोटातील उष्णता कमी होत अल्सरपासून आराम मिळतो.
* तोंड आल्यानंतर वेदना कमी करून तात्पुरते बधीरत्व आणणारी मलमे सध्या उपलब्ध आहेत. त्याचा वापर डॉक्टरांच्या सल्ल्याने करा.
* उष्णतेने तोंड आले असल्यास नारळपाणी, सौम्य चवीचे सूप, थंड दुध असे पदार्थ आहारात घ्यावेत.
* आहार चौरस व सर्व पोषक द्रव्यांचा पुरवठा होईल, असा असावा. अति तिखट, तेलकट, मसालेदार पदार्थ टाळावे.
* तोडांची नियमित व योग्य प्रकारे स्वच्छता करावी.
* जेवणाच्या वेळा पाळाव्यात. रात्रीची झोप व्यवस्थित घ्यावी.
* फास्ट फुड, जंक फुड घेऊ नये. अति थंड, अतिगरम असे पदार्थ खाऊ नये.
* उन्हाळ्यामध्ये मासांहार टाळावाच.
* तोंड आल्यावर जिरे चावून खाल्ल्यानेही फायदा होतो.

# रोह्यात विनापरवाना शेकडो झाडांची कत्तल

## दोघांवर गुन्हा व आठ हजार रुपये दंड; थातूरमातूर कारवाई झाल्याचा दावा

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा येथील सानेगाव जंगल भागातील खाजगी जागेत बेसुमार वृक्षतोड करण्यात आली आहे. वृक्षतोड करण्याचा परवाना न घेता येथील शेकडो झाडांची बेकायदेशीर कत्तल करण्यात आली. या प्रकरणी तक्रार दाखल झाली, परंतु वनविभाग प्रशासन सुस्त राहिले. तक्रारदाराने सातत्याने पाठपुरावा करीत कारवाईसाठी तगादा लावल्याने वन खात्याकडून अखेर नाममात्र कारवाई झाली. दोघांविरोधात गुन्हा दाखल करीत त्याच्याकडून केवळ आठ हजार रुपये दंड जमा करण्यात आला आहे.



रोहा तालुक्यातील सानेगाव येथील घनदाट जगंल भागात काही मालकीच्या ३२ हेक्टर जागेमध्ये झाडांची तोड करण्याचा ठेका देण्यात आला. ठेकेदारांनी तोडकाम करताना लगत असलेल्या अन्य मालकीच्या जागेत देखील विना परवाना झाडांची तोड केली. तोडकाम करण्यापूर्वी हद्द कायम न करता तसेच मालकांची परवानगी न घेता राजरोसपणे शेकडो झाडांची कत्तल केली.

खाजगी मालकीच्या जागेतील साग, जाभूळ, खैर, आंबा, ऐन, शिरस इत्यादी झाडांची बेसुमार तोड करण्यात आली. सानेगाव येथील हा जंगल भाग निर्मनुष्य असल्यामुळे ठेकेदाराने याभागात अक्षरशः हैदोस घातले. याप्रकरणी जमीन मालक अमलकांत मोरे यांनी लेखी तक्रार दिली. त्यानंतरही वनविभाग प्रशासन ढिम्म राहिले. तक्रारदार यांनी सातत्याने पाठपुरावा करीत कारवाईसाठी तगादा लावल्याने अखेर वन खात्याने दोघांविरोधात थातूरमातुर कारवाई केली आहे. मागील २ वर्षात या तोडकामाच्या माध्यमातून लाखो रुपये किंमतीच्या झाडांची तस्करी करण्यात आली आहे.

वृक्षतोडीच्या कामाचा परवाना घेत असताना सातबारा उताऱ्यावरील असलेले काही जमीन मालक मयत असताना देखील वारसनोंदी न करता केवळ साध्या कागदावर सह्या घेऊन संबधित ठेकेदाराला तोडकामाची परवानगी देण्यात आली आहे, असे आरोप तक्रारदार सामाजिक कार्यकर्ते अंमलकांत मोरे यांनी केले आहेत.

> **वन खात्याकडून या घटनेचा पंचनामा करण्यात आलेला आहे. याप्रकरणी कैलाश पांडुरंग जंगम व सतीश काशिनाथ म्हात्रे या विनापरवाना तोडकाम करणाऱ्या दोन व्यक्तींवर गुन्हा दाखल करून त्यांच्याकडून आठ हजार रुपये दंड जमा करण्यात आला आहे.**
> **–मनोज वाघमारे,**
> **वनपरीक्षेत्र अधिकारी, रोहा**

> **वृक्षतोड आणि वणवे याबाबत वनविभागाची भूमिका संशय निर्माण करणारी आहे. याबाबत अनेक तक्रारी येत असल्याने याविषयी पालकमंत्र्यांची भेट घेऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करणार आहोत.**
> **–नितिन परब,**
> **रोहा सिटीझन फोरम**

> **वन खात्याच्या मर्जीनेच येथे शेकडो झाडांची तोड होत आहे, त्यामुळे तक्रार दिल्यानंतरही दिरंगाईने नाममात्र कारवाई करण्यात आली. या कारवाईने समाधानी नसून वनमंत्र्यांची भेट घेऊन त्यांच्याकडे तक्रार दाखल करणार आहोत.**
> **–अंमलकांत मोरे,**
> **जमीन मालक**


# चौक लोहप मार्गावर धोकादायक वळणावर रुंदीकरणाचे काम सुरू

**खोपोली : प्रतिनिधी**

चौक लोहप राज्यामार्गावर डांबरीकरण सुरू असून धोकादायक वळणाच्या ठिकाणी रस्ता रुंदीकरण करण्यात येत असल्याने अपघातावर नियंत्रण येणार आहे. तालुक्यातील महत्त्वाच्या मार्गापैकी चौक लोहप राज्यमार्ग आहे. जुना मुंबई पुणे महामार्ग आणि सावरोली खारपाडा राज्य मार्गाला जोडणारा महत्त्वाचा रस्ता म्हणून चौक मार्ग वाहतुकीसाठी सोयीस्कर आहे.

यामार्गवरिल तुपागाव, टेंभरी, कोपरी आसरोटी ग्रामस्थांचा नेहमीचा दळणवळणाचा मार्ग असून पाताळगंगा औद्योगिक वसाहतीकडे जाण्यासाठी कामगार वर्ग देखील मोठ्या प्रमाणात वापर करत असल्याने कायम रहदारीने व्यस्त असतो. पावसाळ्यापूर्वी रस्त्याची डागडुजी हाती घेण्यात आली असून, डांबरीकरण, आवश्यक त्या ठिकाणी पावसाळी मोरी बांधकाम सुरू आहे. धोकादायक वळण असलेल्या ठिकाणी रस्ता रुंद करण्यात येत आहे. यामुळे प्रवाशी वर्गात समाधान व्यक्त केले आहे.

> **धोकादायक वळणामुळे समोरचे वाहन दिसत नसल्याने अपघात घडले होते. रस्ता वळणावर रूंद झाल्याने, अपघाताची भीती कमी झाली आहे.**
> **–योगेश गुरव, सामाजिक कार्यकर्ते, तुपगाव चौक**



# गोवेले कुंभारवाडीच्या राधाकृष्ण मंदिरात हरिनाम सप्ताह साजरा

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराजांची पावन भूमी ओळखले जाणारे गोवेले हे गाव असून गोवेले कुंभारवाडीतील राधाकृष्ण मंदिरामध्ये दरवर्षीप्रमाणे ३३ वर्षाची परंपरा कायम ठेवत अखंड हरिनाम सप्ताह २२ ते २५ एप्रिल या कालावधीत भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.

परमपूज्य स्वानंद सुखनिवासी गुरुवर्य धोंडू महाराज कोलाटकर आणि पांडुरंग महाराज थळे स्वानंद सुखनिवासी गणेशनाथ महाराज यांच्या कृपाशीर्वादाने तसेच दत्तू महाराज कोलाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला होता.

शनिवार २२ एप्रिल रोजी सकाळी ५ ते ७ काकड आरती, ८ ते १० श्रीमद्ज्ञानेश्वरीचे पारायण, दुपारी १:३० मिनिटांनी राधाकृष्ण मंदिराचा कलशारोहन दुपारी २ वाजता राधाकृष्ण मंदिराचे लोकार्पण सोहळा व सभा मंडपाचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्या सुषमाताई गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले.



कार्यक्रम प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपली उपस्थिती लावली होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष शंकर म्हशीलकर, उपाध्यक्ष गणेश गोविंलकर, सेक्रेटरी रामचंद्र चिविलकर, खजिनदार चंद्रकात सवातकर, मुंबई मंडळ अध्यक्ष अनंत खेडेकर, सेक्रेटरी कृष्णा पंदेरकर, खजिनदार सुधीर आंजर्लेकर, त्याचबरोबर गजानन पंदे रकर, वसंत चिविलकर, भिकू शिंदे, अरुण खेडेकर, भास्कर शिंदे, विलास गोविलकर,विलास गोविलकर, तसेच ग्रामस्थ,महिला मंडळ, मुंबई मंडळ यांनी परिश्रम घेतले.

# उष्माघाताचे परिणाम टाळा, योग्य ती काळजी घ्यावी –तहसीलदार तांबोळी

**चौक : प्रतिनिधी**

आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत सर्व कार्यकारी यंत्रणामध्ये समन्वय राहण्यासाठी उन्हाळी हंगामातील उष्मलाटेमुळे उद्भवणाऱ्या उष्माघातानी मानव, पशु–प्राणी व शेती पिकांवर होणारे दुष्परिणाम टाळण्याच्या दृष्टीने विविध विभागांनी कार्यवाही करावी असे आवाहन खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केले आहे.



उष्माघात उपाययोजनासाठी स्थानिक स्तरावर करावयाच्या नियोजनाविषयी सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, रस्ते परिवहन विभाग, चठएऋड, पशु संवर्धन, वन विभाग, उपनिबंधक, सहकारी संस्था, विभाग, पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम या विभागांनी उष्माघाताचे परिणाम कमी करण्यासाठी अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीचे आराखडे तयार करण्याबाबत सूचविले आहे. उष्णतेची लाट अथवा उष्माघाताचा विचार करताना तापमाना व्यतिरिक्त हवेतील आर्द्रता, धुळीचे कण, हवेचे प्रदूषण या बाबीसुध्दा विचारात घेवून भौगोलिक व वातावरणीय बाबींचा विचार करून याबाबतचे नियोजन करणे आवश्यक आहे.

किंवा छत्रीचा वापर करावा, तसेच ओल्या कपडयांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावा, शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओ.आर.एस.घ्यावे, घरी तयार करण्यात आलेली लस्सी, ताक, कैरीचे पन्हे, लिंबू पाणी इत्यांदीचा नियमित वापर करण्यात यावा, अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा.

लहान मुलांना किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये, दुपारी १२ ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**EXTENSION TO E–TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & Registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000027083** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-19/2023-2024. Extension to RFx E-Tender for AMC for Restoration and Maintenance of the SECURITRON Make Fire Detection and Alarm System provided at 220kV Taloja, Uran and ONGC Panvel Substation under EHV (O&M) Division, Panvel. |
| 2 | Online Downloading of the RFx | 27.04.2023, 17:00 Hrs to 07.05.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 07.05.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 08.05.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-27465410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**


# डॉ. दीपक देशमुख यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार जाहीर

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील डॉ. दीपक रमेश देशमुख यांना अविष्कार फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य या सेवाभावी संस्थेतर्फे राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार २०२३ जाहीर झाला असल्याची माहिती निवड पत्र पाठवून फाऊंडेशनचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष पत्रकार संजय पवार व फाऊंडेशनचे रायगड जिल्हा कार्याध्यक्ष तथा निवड समितीचे सदस्य शंकर शिंदे यांनी दिली.



या पुरस्काराचे वितरण रविवार ३० एप्रिल रोजी सकाळी १०:३० वा. जोतिबा रॉयल रिसॉर्ट, श्री क्षेत्र जोतिबा (वाडी–रत्नागिरी) ता. पन्हाळा जि. कोल्हापूर या ठिकाणी करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेतर्फे देण्यात आली आहे.

डॉ. दीपक देशमुख यांची उपरोक्त संस्थेकडून राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कारासाठी निवड झाल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# मुरूड येथे रविवारी संगीत समारोह

**मुरुड : प्रतिनिधी**

पै. खाँ साहेब आबीद हुसैन स्मृति संगीत मंडळ मुरुड–जंजिरा यांचेतर्फे रविवारी ३० एप्रिल रोजी वसंतराव नाईक महाविद्यालय, मुरुड येथे दुपारी ४ ते ८ वा. संगीत समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे.

समोराहात स्वरांगी पेंडसे, मिलिंद गोखले(पनवेल) मंगेश लटके (कल्याण) व शास्त्रीय संगीतकार डॉ. रवींद्र नामजोशी यांचे गायनाचे कार्यक्रम सादर होणार आहेत. यंदाचा गिरीजा कीर संगीत प्रेमी पुरस्कार स्वराली पेंडसे यांना देण्यात येणार आहे. रसिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन कार्यवाह डॉ. नामजोशी यांनी केले आहे.


**सिडको** शहरांचे शिल्पकार

**जाहीर सूचना**

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्रात (नैना)**

सदर जाहीर सूचनेद्वारे सर्व जनतेस सूचित करण्यात येत आहे की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना) साठी शासन अधिसूचना क्र.टिपीएस–१७१२/४७५/प्र.क्र.–९८/१२/नवि–१२ दि.१३/०१/२०१३ अन्वये सिडको महामंडळाची '**विशेष नियोजन प्राधिकरण**' म्हणून नियुक्ती केली आहे.

सबब दि. १३/०१/२०१३ पासून नैना क्षेत्रातील सर्व प्रकारच्या बांधकामासाठी (गावठाण क्षेत्रासह) नगररचना विभाग (नैना) सिडको यांचेकडून रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे, परंतु अशा परवानगी शिवाय बांधण्यात येणारी बांधकामे, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार अनधिकृत आहेत.

यास्तव, अशा प्रकारच्या अनधिकृत बांधकामाबाबत लोकांनी कोणत्याही प्रकारचे व्यवहार, करार किंवा अभिहस्तांतरण / खरेदी व्यवहार करू नयेत, अशी सावधगिरीची सूचना देण्यात येत आहे. लोकांनी वाणिज्यिक, निवासी किंवा कोणत्याही मालमत्तेचे बुकींग किंवा खरेदी करण्यापूर्वी जमिनीचे वर्तमानातील मालकी हक्क तसेच सिडकोतर्फे देण्यात आलेली कागदपत्रे आणि नियोजन विभाग (नैना) यांचेकडून देण्यात आलेला बांधकाम/विकास परवाना यांची शहानिशा करावी, अन्यथा आपणास संभाव्य आर्थिक नुकसानीस तसेच कायदेशीर कारवाईस सामोरे जावे लागेल. अशा प्रकारच्या व्यवहारांस किंवा आर्थिक नुकसानीस सिडको महामंडळ जबाबदार राहणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

**आदेशावरून**

**मुख्य नियंत्रक अनधिकृत बांधकामे (नैना)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**सिडको/जनसंपर्क/०५३/२०२३–२४**



**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन–४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :– coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट :– http://kbmc.gov.in

जा.क्र./कुबनप/मिळकत विभाग/५५६६/२०२३–२०२४ दिनांक :– २४/०४/२०२३

**जाहीर ई निविदा सूचना**

कुळगाव बदलापूर नगरपरिषद, मौजे कुळगाव पश्चिम, हेंद्रेपाडा, प्रभाग क्र.४ येथील कु.ब.न.प. मालकीच्या स्पर्धा परीक्षा केंद्र/अभ्यासिकेचे व्यवस्थापन, तसेच कु.ब.न.प.च्या सयुंक्त विद्यमानाने स्पर्धा परीक्षा केंद्र व अभ्यासिका चालविणे कामी तात्पुरत्या स्वरुपात अभिकर्ता नेमणे बाबत नोंदणीकृत संस्था याचे कडून निविदा मागवित आहे. सदर निविदेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१) ई–निविदा संच विक्री व स्विकृती (online ONLINE) दिनांक २७/०४/२०२३ सकाळी १०.०० ते दिनाक ०३/०५/२०२३ दुपारी ३.०० वाजेपर्यंत.
२) ई–निविदा उघडणे (शक्य झाल्यास) दिनाक ०४/०५/२०२३ दुपारी ३.०० वाजता.
३) सदरची निविदा फक्त httphttp:/kbmc.gov.in व http:/mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
४) प्राप्त निविदापैकी कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे बाबतचा मुख्याधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.
५) सविस्तर माहितीसाठी मिळकत विभाग कुबनप या विभागाकडे संपर्क साधता येईल.

**सही/**
**(योगेश गोडसे)**
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद



**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**
**मु.पो. गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड**

जावक क्र. : २०/२०२३–२०२४ दिनांक : २६/०४/२०२३

**साहित्य खरेदीची जाहिरात**

ग्रूप ग्रामपंचायत गुळसुंदे हद्दीतील १५ वित्त अंतर्गत सन २०२०–२०२१ व २०२१–२०२२ या वर्षातील खर्च करणे करिता खालीलप्रमाणे विकास कामे व साहित्य खरेदी करावयाची आहे. अधिकृत व अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर साहित्याच्या निविदा / दरपत्रके दि. २६/०४/२०२३ ते दि. ०८/०५/२०२३ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात सादर कराव्यात.

सदर निविदा/दरपत्रके त्याच दिवशी किवा ग्रामपंचायत ठरवेल त्यादिवशी कार्यालयीन वेळेत उघडण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याच्या अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव व योजना नाव | निधी | एकूण खर्च करणेची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी करिता ई–लर्निंग साहित्य पुरविणे. | १५ वित्त (अबंधित २०२०/२०२१ | ५५२१६/– |
| २ | प्रा. शाळाना ई लर्निंग साहित्य ५ लॅपटॉप पुरविणे. | १५ वित्त (अबंधित २०२०/२०२१ | १३००००/– |
| ३ | अंगणवाडी लाडीवलीकरिता गॅस शेगडी पुरविणे. | १५ वित्त (अबंधित २०२१/२०२२ | २०००/– |
| ४ | अ. जाती/अ. जमाती वस्तीमध्ये सौर दिवे बसविणे. | १५ वित्त (अबंधित २०२१/२०२२ | २३८२७२/– |

टिप :–
१) निविदा दरपत्रके भरणाऱ्या सर्व कंत्राटदारांनी दि.२६/०४/२०२३ ते दि. ०८/०५/२०२३ रोजी दुपारी १ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय गुळसुंदे येथे सिलबंद लिफाफा जमा करणे बंधनकारक आहे.
२) निविदा/दरपत्रके भरताना आपले दर G.S.T. सह भरणे बंधनकारक आहे. G.S.T.चे दर संबधित विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.
३) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा / दरपत्रके नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
४) मुदतीनंतर आलेल्या खाडाखोड करून साक्षांकित न केलेल्या व अटी शर्ती युक्त निविदा/ दरपत्रके स्वीकारल्या जाणार नाहीत.
५) कोणत्याही नामंजूर निविदासंदर्भात निविदा/ दरपत्रके धारकास कोणत्याही प्रकारे लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.
६) ठेकेदार ग्रामपंचायतीचा येणे भागीदार असल्यास निविदा / दरपत्रके रद्द करण्यात येईल.

**सही/–**
**समदास बा. दासगावकर**
ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे
ता. पनवेल, जि. रायगड

**सही/–**
**हरीश्चंद्र ल. बांडे**
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे
ता. पनवेल, जि. रायगड


# भजन, कीर्तनात गोवेलेवासीय मंत्रमुग्ध

**माणगाव : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराजांची पावन भूमी ओळखले जाणारे गोवेले हे गाव असून गोवेले कुंभारवाडीतील राधाकृष्ण मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताह २२ ते २५ एप्रिल या कालावधीत साजरा करण्यात आला. यानिमित्त भजन आणि किर्तनात गोवेलेवासिय मंत्रमुग्ध झाले होते.

यावेळी किरण महाराज कुंभार (शास्त्री पाली), पांडुरंग महाराज उत्तेकर कल्याण, जागर प्रसादिक भजन मंडळ गवळवाडी, नथुराम बुवा देऊलकर (मूर ) यांचे प्रवचन, संजय बुवा पंदेरकर यांचे कीर्तन, जागर काळभैरव प्रासादिक भजन मंडळ मुळगाव गोवेले, जागर कुंभार भजन मंडळ मूर, श्री. गोपाळ कृष्ण भजन मंडळ कुंभारवाडी, श्री. दत्तू महाराज कोलाटकर, (श्रीक्षेत्र पंढरपूर) चोपदार चंद्रकांत सवातकर, दिंडी सोहळा, महाप्रसाद आदी कार्यक्रमांत रसिक मंत्रमुग्ध झाले.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ०८/२०२३–२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १ | म.औ.वि.महामंडळाच्या तारापूर, बदलापूर, रोहा, महाड आणि रांजणगाव या निवडक औद्योगिक क्षेत्रांतील सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये पाण्यामध्ये सुधारणा करण्यासाठी डिझाईन, रेखाचित्रे, अंदाजपत्रके, निविदा प्रपत्रे तयार करणे करीता सल्लागार निवडण्यासाठी प्रस्ताव मागविणेबाबत. |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक २७/०४/२०२३ ते दिनांक ११/०५/२०२३ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक ०२/०५/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०४/०५/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# शिवराय, डॉ. आंबेडकर ऐक्यासाठी लढले

## ना. रामदास आठवले यांचे प्रतिपादन; कोकण भवनात संयुक्त जयंती साजरी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे, शिक्षणाशिवाय मनाचा विकास होत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणाशी नाते होते. ते केवळ दलितांच्या मुक्तीसाठी लढले नाही, तर देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांचा लढा होता. तर छत्रपती शिवाजी महाराज मराठी माणसाला न्याय देण्यासाठी गनिमी काव्याने लढले. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देशातील ऐक्य अबाधित ठेवण्यासाठी लढले होते, असे मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केले.



छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव नवी मुंबईतील कोकण भवन येथे जल्लोषात साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास कोंकण पदवीधर मतदार संघाचे आ. निरंजन डावखरे, महा मुंबई मेट्रोचे संचालक निखील मेश्राम, आगरी कोळी समाज, शेतकरी प्रबोधिनीचे अध्यक्ष राजाराम पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे उपस्थित होत्या. तसेच नगररचना विभागाचे सहसंचालक जितेंद्र भोपळे, माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, वैद्यकिय अधिकारी डॉ. गणेश धुमाळ, स्माईल्स फाऊंडेशन्सच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. उमा अहूजा आणि डॉ. धीरज अहुजा यांची विशेष उपस्थिती होती.

जयंती महोत्सवाच्या प्रारंभी मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज, राजश्री शाहू महाराज, महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या प्रतिमेला पूष्प अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी श्री. आठवले म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ दलितांच्या मुक्तीसाठी लढले नाही, तर समाजाला दिशा देण्यासाठी लढले. त्यांनी जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी काम केले. जातीपेक्षा देश मोठा आहे म्हणूनच देशासाठी लढा हि भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडली. आंबेडकरांनी दामोधर व्हॅलीत पाच धरणे बांधली या मागील संकल्पना म्हणजे जलसाठे वाढविणे जेणे करून जनतेचा, प्राणी, पशुपक्ष्यांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल त्याचबरोबर जलसंधारण वाढेल. पाणीपत युद्धासाठी छत्रपती शिवाजी महाराज मावळे दिल्लीला घेऊन गेले आणि तेथे ते स्वराज्यासाठी लढले. त्यांनीदेखील जाती व्यवस्थेला आळा घालण्याचे काम केले असल्याचे श्री. आठवले यांनी या वेळी सांगितले.

या वेळी आमदार निरजंन डावखरे, आगरी कोळी समाज, शेतकरी प्रबोधिनी राजाराम पाटील यांनीदेखील समायोचित भाषणे केली.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**कार्यक्रमामध्ये आमदार निरंजन डावखरे यांनी आमदार निधीतून डिजीटल लायब्ररीसाठी कोणी संस्था पुढे आल्यास त्या संस्थेस दहा लाख रुपये देण्याचे जाहिर केले. केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते आनंद गुप्ता, मृणाली राजपक्षे, राधा साफी, मिताली वाघे या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. स्माईल्स फाऊंडेशनच्या वतीने इयत्ता चौथी ते बारावीपर्यंतच्या गरजू विद्यार्थ्यांना बायजूजचे तीन वर्षाकरिता मोफत सदस्यत्व देण्यात आले.**

सकाळी १० ते दूपारी २ या वेळेत मेडीकव्हर हॉस्पिटल खारघर नवीमुंबई यांच्यावतीने सर्वांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या ठिकाणी ऐतिहासिक शस्त्रे व नाणी यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. नगररचना विभागाचे सहसंचालक जितेंद्र भोपळे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्‌घाटन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आधारीत झी हिंदी वाहिनीवरील एक महानायक या हिंदी मालिकेचे दिग्दर्शक विनोद माणिकराव, या मालिकेत डॉ. बाबासाहेबांची मुख्य भूमिका साकारणारे अभिनेता अथर्व कर्वे, यांची प्रमुख उपस्थिती होती. अभिनेता श्री. कर्वे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भुमिका साकारताना आलेले अनुभवन सांगितले. तसेच संदीप जठारी यांनी काढलेली रांगोळी यावेळी आकर्षण ठरली. या वेळी अधिकारी व कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यानंतर मराठी पाऊल पडते पुढे या कलामंचाने छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारीत शिव-भीम गीतांचा जल्लोष भिम वंदना हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. सांस्कृतिक कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

हा जयंती महोत्सव यशस्वी करण्यासाठी समितीचे उपाध्यक्ष नरेश वाघमारे, सचिव प्रवीण डोंगरदिवे, सहसचिव अजित न्यायनिर्गुणे, कोषाध्यक्ष मंगेश येलवे, खजीनदार अपर्णा गायकवाड, सदस्य वनिता कांबळे, मनोज राजपक्षे, विनोद वैदू, कमलेश वानखडे, बाळासाहेब मोगले, जनाबाई साळवे, बाबूराव बनसोडे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# महापालिका क्रिडांगणाच्या नामफलकाची दुरूस्ती करा




**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा सेक्टर ९ मधील महापालिकेच्या क्रिडांगणाच्या नामफलकाची दुरुस्ती करण्याची लेखी मागणी भारतीय जनता युवा मोर्चा, नवी मुंबईचे जिल्हा उपाध्यक्ष आणि अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्तांकडे लेखी निवेदनातून केली आहे.

**भाजप नेते पांडुरंग आमले यांची मागणी**

सानपाडा सेक्टर ९ मधील भुखंड क्रं ३ येथे महापालिकेचे क्रिडांगण असून त्या क्रिडांगणाला महापालिका प्रशासनाकडून झाशीची राणी खेळाचे मैदान असे नाव देण्यात आलेले आहे. क्रिडांगणात प्रवेश करतानाच प्रवेशद्वारावरच महापालिका प्रशासनाकडून क्रिडांगणाचा नामफलकही बसविण्यात आला आहे. परंतु या नामफलकातील राणी हा शब्द निखळून पडला असल्याने नामफलकावर केवळ झाशीची खेळाचे मैदान असा उल्लेख आहे. १८५७चा स्वातंत्र्यसंग्राम गाजविणाऱ्या झाशीच्या राणीचे नाव या क्रिडांगणाला देण्यात आले असल्याने त्या नामफलकाची काळजी घेणे महापालिका प्रशासनाचे कर्तव्य आहे.

राणी हा शब्द गळून पडल्याने सानपाडावासियांनी मोठ्या प्रमाणावर आमच्या कार्यालयात येवून नाराजी व्यक्त केली आहे. झाशीची राणी या नावाशी अनेकांच्या भावना जोडल्या गेल्या असल्याने तत्काळ त्या नामफलकाची दुरुस्ती करुन त्या ठिकाणी राणी हा शब्द बसविण्याचे संबंधितांना निर्देश देण्याची मागणी महापालिका आयुक्तांकडे पांडुरंग आमले यांनी केली आहे.

यापूर्वीही याच समस्येवर पांडुरंग आमले यांनी २० मार्च २०२३ रोजी महापालिका आयुक्तांना लेखी निवेदन सादर केले होते. त्यांनीही नामफलकाची दुरुस्ती करण्यासाठी तातडीने संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन फॉरवर्ड केले होते. तथापि महिना झाला तरी नामफलक तसाच असल्याचा संताप व्यक्त करताना पांडुरंग आमले यांनी आम्हाला तशी परवानगी द्या, आम्ही आमच्या खर्चाने चांगल्या स्वरूपातील मानफलक त्या क्रिडांगणावर बसवू असे म्हटले आहे.

# नवी मुंबईत तीन दिवसीय योग महोत्सव रंगणार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्री रामचंद्र मिशनच्या हार्टफुलनेस इन्स्टिटयूटचा वेलनेस फेस्ट योग महोत्सव कार्यक्रम हा स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवनिमित्त २९ एप्रिल ते १ मे अशा तीन दिवसीय वाशी, नवी मुंबई येथील सिडको एक्झिबिशन आणि कन्व्हेन्शन सेंटर येथे मोफत होणार आहे.



हा कार्यक्रम श्री रामचंद्र मिशनच्या हार्टफुलनेस इन्स्टिट्यूटने भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्याने आयोजित केला आहे. कोविडनंतरचा हा पहिला वेलनेस फेस्ट असल्याने नागरिकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन हार्टफुलनेसच्या संचालक पीआर डॉ. निवेदिता श्रेयांश यांनी पत्रकार परिषदेत केली. २९ एप्रिल २०२३ रोजी संध्याकाळी ६ वाजता पडदा रेझर होणार आहे. आमदार मंदा म्हात्रे, नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर, पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, डॉ. के. एम. वासुदेवन, जतिन किशोर, डॉ. मिकी मेहता, शम्मी गुप्ता, आनंद कुमार, प्रतिश आंबेकर, अमरदीप सिंग, सुरेश वाधवा आदी मान्यवर या भव्य उदघाटनाला राहणार आहेत.

कार्यक्रमाच्या संचालिका डॉ. निवेदिता श्रेयांस यांच्या नेतृत्वाखाली आणि नवी मुंबईच्या हार्टफुलनेस व्हॉलंटियर्सच्या सहकार्याने महाराष्ट्रासाठी तुषार प्रधान विभागीय समन्वयक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम होईल.

पत्रकार परिषदेत हार्टफुलनेसच्या संचालक पिआर डॉ. निवेदिता श्रेयांश, हार्टफुलनेस ट्रेनर कपिल ठाकूर, स्मार्ट वेदपाठक मिसेस तीना अमरदिप, प्रतिश अंबेकर आदी उपस्थित होते.

# उलवे येथे घरफोडी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवा येथे राहणारे एक कुटुंब ऐन ईदच्या दिवशी घरी पाणी न आल्याने आपल्या नातेवाइकाकडे गेले होते. मात्र संध्याकाळी घरी येऊन पहिले असता चोरट्यांनी दरवाजाचा कडी कोयंडा तोडून आतील एक लाख ३३ हजाराचे दागिने चोरी केल्याचे समोर आले. या प्रकरणी एनआरआय पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रहिमा बी अब्दुल रहीम लाब्बाय असे यातील फिर्यादीचे नाव आहे. पती दोन मुली सह त्या उलवा सेक्टर १९ येथे राहतात. २२ तारखेला घरी पाणी न आल्याने त्यांनी जवळच राहणार्या आपल्या बहिणीकडे ईद साजरी साजरी करण्यास गेल्या. दुपारी दोन वाजता गेल्यावर संध्याकाळी साडे सहा वाजता घरी आल्यावर दरवाजाला कुलूप नसून केवळ कडी लावलेली त्यांच्या निदर्शनास आले.

आत जाऊन पहिले असता घरातील सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले तसेच कपाटाचा दरवाजा उचकटून आतील दागिने चोरी झाल्याचे समोर आले. त्यात तीन झुमक्याचे जोड, एक नेकलेस, तीन सोन्याची नाणी, अंगठी व रोख पाच हजार असा एकूण एक लाख ३३ हजाराचा ऐवज चोरी झाल्याचे समोर आले. सुरुवातीला या बाबत ऑन लाईन तक्रार देण्यात आली आणि दोन दिवसानंतर पोलीस ठाण्यात प्रत्यक्ष जाऊन दिलेल्या जबाबावर एनआरआय पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

# अनधिकृत केबल्स हटविण्याचे आवाहन



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील अनधिकृत केबल्स हटविण्याचे आवाहन संबंधित विभागाने केले आहे.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील दिवाबत्ती खांबांवरून विनापरवानगी विविध प्रकारच्या केबल्स टाकल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे दिवाबत्ती खांब पडण्याचे, खांबावरील ब्रॅकेट व फिटिंगची दिशा बदलण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याचे निदर्शनास येत असून त्यामुळे अनेकदा अपघात होत आहेत. त्याचप्रमाणे या केबल्समुळे शहर सौंदर्यीकरणालाही मोठ्या प्रमाणावर बाधा पोहचत आहे.

या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देत नवी मुंबई महापालिका विद्युत विभागाच्या वतीने महापालिका क्षेत्रातील सर्व केबल ऑपरेटर तसेच इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हाईडर यांना ही केबल त्वरित पुढील १५ दिवसांच्या कालावधीत काढून टाकणेबाबत सूचना करण्यात आलेल्या आहेत. याबाबतची अंमलबजावणी संबधित केबल ऑपरेटर तसेच इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हाईडर यांनी न केल्यास नवी मुंबई महापालिकेच्या वतीने सदर केबल्स हटविण्यात येतील व यामुळे नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल संबधित केबल ऑपरेटर, इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हाईडर जबाबदार असतील, असे नवी मुंबई महापालिकेच्या वतीने स्पष्ट करण्यात आलेले आहे.

# नाकावाटे होणारे लसीकरण सत्र तात्पुरते स्थगित

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्रालयाच्या कोविड पोर्टलमध्ये तांत्रिक बिघाड झाला आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना नाकावाटे देण्यात येणारी कोविड लसीकरण मात्रा तात्पुरती स्थगित करण्यात आली असल्याचे नवी मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त संजय काकडे यांनी बोलताना सांगितले.

नवी मुंबई महापालिकेकडून नाकाद्वारे वर्धक मात्रा देण्याचे काम शनिवारपासून सुरू करण्यात आले होते. राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करोना लसीकरण कार्यक्रमांतर्गत नाकावाटे घ्यावयाचा इन्कोव्हॅक लसीचा समावेश करण्यात आला असून नाकावाटे दिली जाणारी ही पहिलीच कोरोना प्रतिबंधक लस आहे.

या लसीचे डोस महापालिकेच्या वाशी, नेरूळ व ऐरोली येथील सार्वजनिक रुग्णालयांमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत देण्यात येत आहेत. नवी मुंबई मनपाच्या आरोग्य विभागाच्या वतीने शनिवारपासून ज्येष्ठ नागरिकांना लसीकरण देण्यास सुरुवात केली होती, मात्र केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून कोविड पोर्टलमध्ये तांत्रिक बिघाड झाला परिणामी, त्यांच्या सूचनेनुसार ज्येष्ठ नागरिकांना देण्यात येत असलेल्या नाकावाटे देण्यात येत असलेल्या कोविड लसीकरण मात्राचे काम थांबवावे लागले. लसीकरण सत्राचे नियोजन सुरु करण्याच्या सूचना केंद्रीय मंत्रालयाकडून आल्यावर लगेचच लाभार्थ्यांना लसीकरण सुरु करू, असे अतिरिक्त आयुक्त संजय काकडे यांनी बोलताना सांगितले.

# सकल हिंदू धर्म जनजागरण सभा

**नवी मुंबई :** शीळ डायघर गावातील परमपूज्य स्वामी डी. के. दास महाराज क्रीडांगणावर रविवारी (ता. ३०) सकल हिंदूधर्म जनजागरण महासभा होणार आहे. या सभेसाठी देशभरातील लाखो हिंदू नागरिक उपस्थित राहणार आहेत.

यासाठी नियोजन व व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी सोमवारी रात्री भाजपचे नवी मुंबईतील ऐरोलीचे आमदार गणेश नाईक, माजी खासदार ठाणे डॉ. संजीव नाईक स्थानिक आमदार प्रमोद पाटील यांनी हिंदू जणजागरन सभेच्या ठिकाणी पाहणी दौरा केला व कामाचा आढावा घेतला. सभेला येणाऱ्या सर्व हिंदू नागरिकांना सर्व सुविधा कशा प्रकारे पुरवण्यात येतील आणि ही सभा कशाप्रकारे चांगले होईल यासाठी सकल हिंदू पदाधिकाऱ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले.

# कमी उत्पादनामुळे भाज्या कडाडल्या

## शिमला मिरची, काकडी, वांगी, फरसबीच्या दरात वाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत मंगळवारी भाजीपाल्याचे दर वधारले असून शिमला मिरची, वांगी, फरसबी, काकडीच्या दरात १० टक्के ते १५ टक्के वाढ झाली आहे. अवकाळी पाऊस आणि अतिउष्णतेमुळे भाज्यांचे उत्पादन कमी झाले असून दर वाढले आहेत, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे. अवकाळी पाऊस आणि हवामानात होणारे बदल त्यामुळे उत्पादन कमी झाले असून भाज्यांच्या दर्जावर ही परिणाम झाला आहे. एपीएमसी बाजारात आवक कमी होत असून उच्चतम प्रतीच्या भाज्यांचे दर वधारले आहेत.



एपीएमसीत मंगळवारी ५९४ गाड्यांची आवक झाली असून यामध्ये शिमला मिरची, फरसबी, वांगी आणि काकडीची आवक घटल्याने दर १० टक्के ते १५ टक्के वाढले आहेत,अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे. मंगळवारी एपीएमसीत काकडी ३९२ क्विंटल आवक, शिमला मिरची १४८२ क्विंटल, फरसबी ७६ क्विंटल, वांगी ३२३ क्विंटल, वाटाणा १०४५ क्विंटल, आवक झाली आहे. टोमॅटो, गवार, भेंडी, कोबी, फ्लॉवर, गाजराचे दर स्थिर असून हिरवी मिरची, हिरवा वाटाणा दर उतरले आहेत, तर शिमला मिरची, वांगी, फरसबी, काकडीच्या दरांनी उसळी घेतली आहे.

आधी घाऊक बाजारात फरसबी प्रतिकिलो ४०-४५ रुपयांनी उपलब्ध होती त्यामध्ये १० रुपयांची वाढ झाली असून आता ५०-५५ रुपयांनी विक्री होत आहे. प्रतिकिलो शिमला मिरची आधी २०-२२ रुपये होती ती आता ३०-३२ रुपयांनी विकली जात आहे.

> **अवकाळी पाऊस आणि अतिउष्णतेने भाज्यांच्या उत्पादनाला फटका बसला असून दर्जावर ही परिणाम झाला. त्यामुळे एपीएमसी बाजारात काही भाज्यांची आवक कमी होत असून दरवाढ झाली आहे.**
>
> **-नाना बोरकर, व्यापारी, एपीएमसी**

प्रतिकिलो काकडी १२-१४ रुपयांवरून १६-१८रुपये तर वांगी प्रतिकिलो १२ रुपये होती आता १६ रुपयांनी विकली जात आहेत. एकंदरीत या भाज्यांची १० टक्के ते १५ टक्के दरवाढ झाली आहे, तर हिरवी मिरची आणि मटारचे दर मात्र घसरले आहेत. आधी वाटाणा प्रतिकिलो ८० रुपये होता ते आता ६० रुपयांवर उपलब्ध आहे तर हिरवी मिरची १६-२० रुपयांनी विक्री होत आहे.

# नवी मुंबईत हापूसची आवक घटल्याने निर्यात रोडावली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीत जानेवारी फेब्रुवारीपासून कोकणातील हापूस दाखल होण्यास सुरुवात होते. तसेच मुख्य हंगाम एप्रिल-मेमध्ये सुरू होतो, मात्र यंदा उलट परिस्थिती निर्माण झाली आहे. अवकाळी पावसामुळे एप्रिल-मे महिन्यात दाखल होणाऱ्या हापूसला अवकाळीचा फटका बसल्याने एपीएमसीत आवक घटली आहे. त्यामुळे मुबलक हापूस उपलब्ध नसल्याने हापूसची निर्यातदेखील रोडावली आहे.



मागील वर्षी एप्रिल मध्ये ७० टक्के ते ७५ टक्के निर्यात होती, यंदा मात्र अवघी १० टक्के निर्यात झाली आहे, अशी माहिती निर्यातदार यांनी दिली आहे. यंदा हापुसचे उत्पादन कमी झाल्याने बाजारात मागणीच्या तुलनेत पुरेसा हापूस दाखल होत नसल्याने त्याचा आखाती देशातील निर्यातीवर परिणाम होत आहे. मुबलक हापुस उपलब्ध होत नसल्याने यंदा ऐन हंगामात केवळ १० टक्के निर्यात होत आहे. आखाती देशात, लंडन, ऑस्ट्रेलिया, कुवेत याठिकणी देवगड, रत्नागिरी, अलिबाग येथील हापूस आंब्याना अधिक प्रमाणात मागणी असते.

१५ फेब्रुवारी नंतर टप्प्याटप्प्याने सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड येथील हापूस आंबा दाखल होण्यास सुरुवात होते, परंतु यंदा फेब्रुवारी अखेर अवकाळी पावसाच्या भीतीने वेळेआधीच आंबा बागयदार यांनी हापूसची तोडणी करून विक्रीसाठी बाजारात पाठवला. त्यामुळे यंदा फेब्रुवारी-मार्च मध्ये एकाच वेळी सर्व ठिकाणाहुन हापूस मोठ्या प्रमाणात बाजारात दाखल झाला होता, शिवाय दर ही उतरले होते.

मार्चच्या सुरुवातीपासून ते दोन आठवड्यापर्यंत अवकाळी पावसाने कोकणाला दोन ते तीन वेळा झोडपून काढले. त्यामुळे ऐन हापूसच्या हंगामात आंब्याच्या झाडावर अवेळी पालवी फुटली,पालवी फुटल्याने आंब्याचे शोषण झाले असून पुरेसे पोषण न मिळाल्याने आंबे गळ झाली. हेच आंबे एप्रिलमध्ये विक्रीसाठी दाखल होणार होते.

> **मार्चमध्ये हापूस निर्यातीचा जोर वाढला होता, परंतु आता अवकाळी पावसाने हापूसचे उत्पादन घटले आहे. त्यामुळे मुबलक हापूस उपलब्ध नसून निर्यात कमी होत आहे. मागील वर्षी एप्रिलमध्ये ७५ टक्क्यांपर्यंत निर्यात होती, परंतु आता अवघे १० टक्के निर्यात होत आहे. त्यामुळे त्याचा दरावरही परिणाम झाला असून दरवाढ झाली आहे.**
>
> **-मोहन डोंगरे, आंबा निर्यातदार, एपीएमसी**

> **मार्चमध्ये पडलेल्या अवकाळी पावसाने आंब्याच्या झाडावर अवेळी पालवी फुटली परिणामी आंबा गळ झाली. एप्रिलमध्ये दाखल होणाऱ्या हापूस आंब्यावर परिणाम झाला आहे. त्यामुळे हापूस उत्पादन घटले आहे. परिणामी निर्यातीही कमी होत आहे.**
>
> **-चंद्रकांत मोकल, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघ**

अवकाळीने हाताशी आलेले उत्पादन वाया गेले. एप्रिल ते मे अखेरपर्यंत निर्यातीवर जोर असतो, मात्र हापूसच्या मुख्य हंगामातच मुबलक हापूस उपलब्ध नसल्याने मागील वर्षीच्या तुलनेत आता निर्यात ही ६० टक्के कमी झाली आहे.

# माणगाव बसस्थानकाची स्थिती ‘जैसे थे’


## १६ लाख कॉँक्रीटीकरणावर खर्च; खड्डेमुक्त आवारासाठी लागणार निधी

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील महत्वाचे असणाऱ्या माणगाव बसस्थानक आवारात गेले अनेक दिवस प्रवासी नागरिक बसस्थानकात पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांशी सामना करीत होते.

याबाबत राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे प्रशासन डोळेझाक करीत होते. नागरिकांची समस्या लक्षात घेता माणगाव बसस्थानकातील पडलेल्या खड्ड्यातील पाण्यात उभे राहून युवा सैनिक व शिवसेना पदाधिकारी यांनी आंदोलन छेडले होते.

ही मागणी आ. भरत गोगावले यांच्याकडे केली होती. त्यानुसार आ. गोगावले यांनी राज्य परिवहन महामंडळाचे संबंधित अधिकाऱ्यांकडे या मागणीचा पाठपुरावा करून बसस्थानकातील प्रवेशद्वाराजवळ १६ लाख रुपये कॉंक्रीटीकरणाचे काम मंजूर करुन घेतले. ते काम एका ठेकेदारामार्फत करण्यात आले. मात्र उर्वरित बसस्थानक आवार खड्डेमुक्त करण्यासाठी आणखीन निधीची गरज भासत आहे. हे काम पावसाळ्यापूर्वी न झाल्यास प्रवाशांना पावसाळ्यात चिखलातून पायपीट करावी लागणार



आहे. या कामासाठी पुढचे पाऊल कधी? असा प्रांजळ सवाल प्रवासी नागरिक करीत आहेत.

२२ जुलै रोजी युवासेनेने माणगाव बसस्थानकात खड्ड्यांच्या दुरवस्थेबाबत आंदोलन करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यावेळी परिवहन मंडळाच्या प्रशासनाला आंदोलन कर्त्यांनी सविस्तर निवेदन दिले होते. त्यानंतर परिवहन महामंडळ प्रशासनाने तत्काळ जेसीबी लावून तात्पुरते खड्ड्यांची डागडुजी केली होती. त्यानंतर १ ऑगस्ट २०२२ रोजी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून सबंधित कामाच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यानंतरही निविदा प्रक्रिया मंजुर करण्यात ३ महिन्यापासून दिरंगाई चालूच राहिली. आ. भरत गोगावले यांच्या माध्यमातून राज्य परिवहन महामंडळाकडे पाठपुरवा केल्यानंतर निविदा मंजुर करण्यात आली. २ नोव्हेंबर रोजी संबंधित ठेकेदाराला कामाची वर्क ऑर्डर देण्यात आली असून हे कॉक्रीटीकरणाचे काम सध्या पूर्ण झाले आहे.

बसस्थानक आवारातील कॉक्रीटीकरण पावसाळ्यापूर्वी न झाल्यास आवारातील आर्धा भाग चिखलात राहणार आहे. त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होणार आहे.

प्रवासी नागरिकांना बसस्थानकात ये-जा करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे. नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नात आमदार भरत गोगावले, रा.प.मुंबई प्रदेश कार्यकारी अभियंता, रायगड विभाग नियंत्रक, कनिष्ठ अभियंता, माणगाव आगार व्यवस्थापक यांनी उर्वरित लागणारा निधी मंजूर करून हे काम पूर्ण करावे अशी मागणी होत आहे.

महाड, माणगाव, पोलादपूर विधानसभा आ. भरत गोगावले यांच्या प्रयत्नातून बस स्थानक आवारातील कॉक्रीटीकरणासाठी निधी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून १६ लाख रुपये मंजूर करण्यात आले होते.

# राजपुरी ग्रामपंचायत ग्रामसेवकावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा

## हरिदास बाणकोटकर यांची पत्रकार परिषदेत मागणी

**मुरुड : प्रतिनिधी**

राजपुरी कोळीवाडा येथील सात घरे अनधिकृत असून ती पाडण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी मी मुरुड तहसील कार्यालयासमोर उपोषणास बसलो होतो. त्या वेळी राजपुरी ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका झिराडकर व गटविकास अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मला ग्रामपंचायतीकडून लेखी आश्वासन देण्यात आले होते कि, डिसेंबर २०२२ पर्यंत जागेची मोजणी करून त्यानंतर जागेची तपासणी करून ती अनधिकृत घरे पाडण्यात येतील. असे लिखित आश्वासन देऊन आपण उपोषणास बसू नये अशी विनंती केल्यामुळे हरिदास बाणकोटकर यांनी उपोषण समाप्त केले होते.

आज १५ ऑगस्ट संपून एवढे महिने वाया गेले तरी जागेची मोजणीचा झाली नाही ना अनधिकृत घरे पाडण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली



नाही. राजपुरी ग्रामसेविका यांनी मला आश्वासन दिले म्हणून मी उपोषणास बसलो नाही. माझी फसवणूक करणाऱ्या ग्रामसेवक यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी हरिदास बाणकोटकर यांनी पत्रकार परिषदेमध्ये केली आहे. यावेळी त्यांच्या पत्नी गीता बाणकोटकर उपस्थित होत्या.

याबाबत अधिक माहिती सांगताना हरिदास बाणकोटकर यांनी सांगितले कि, तहसीलदार मुरुड सांगतात हि सर्व जबाबदारी राजपुरी ग्रामपंचायतीची आहे. तुम्ही तिथेच संपर्क साधावा त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मी राजपुरी ग्रामपंचायतीकडे पाठपुरावा करीत असून आज एवढे महिने निघून गेले तरी कोणतीही कार्यवाही होत नाही. ज्यांनी मला लिखित आश्वसन दिले त्यांनीच या कामाची पूर्तता करणे आवश्यक असताना मला मुरुड पोलीस निरीक्षकसुद्धा मदत करीत नसल्याची नाराजी व्यक्त केली आहे.

**उपोषणाचा इशारा**

राजपुरी कोळीवाडा येथील अनधिकृत घरे तोडली नाहीत अथवा कोणतीही कार्यवाही झाली नाही तर मी माझ्या कुटुंबासोबत जिल्हाधिकारी रायगड यांच्या कार्यालयासमोर लवकरच उपोषण करणार असल्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला आहे.

# गटशिक्षणाधिकारी बाबुलाल पाखरे सेवानिवृत्त

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी बाबुलाल किसन पाखरे नियत वयोमानानुसार ३१ मे रोजी सेवानिवृत्त होत आहेत. शिक्षकाना मे महिन्याची सुट्टी २ मे पासून लागणार असल्याने शिक्षकांनी मोठ्या उत्साहात पाखरे सरांचा सेवापूर्ती सोहळा साजरा केला.

पाखरे सरासोबत कार्यालयीन वरिष्ठ सहाय्यक राजश्री नागे सेवानिवृत्त होत असल्याने त्यांचा सत्कार संयुक्तपणे आयोजित करून मुरुड तालुक्यातील शिक्षकांनी समाजाला व इतर तालुक्यांना एक चांगला आदर्श घालून दिला. कार्यक्रमासाठी तालुक्यातून १५० शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी उपशिक्षणाधिकारी सुनील भोपले, माणगाव गटशिक्षणाधिकारी खरात, जिल्हा समन्वयक संदीप वारगे, मुरुड गटविकास अधिकारी संगीता भांगरे, आयसीडीएस प्रमुख संजय शेडगे, मुरुड मुख्य लेखा सहाय्यक वानखडे, मुरुड विस्तार अधिकारी सुनील गवळी, प्रशासन अधिकारी दिपाली दिवेकर, केंद्रप्रमुख मोहिनी पाटील व सर्व केंद्रप्रमुख आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन केल्याबाबत राजू नाईक व जगदीश चवरकर यांचा सत्कार केला. पाखरे सरांनी आपल्या मनोगतांत सर्वाचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजू नाईक, मोहिनी पाटील, रमेश भगत, शरद पाटील, शिवप्रसाद रोडगे, दिनेश म्हात्रे, महेंद्र सातामकर, जितेंद्र मकू, राजेश भोईर, राजेंद्र साळावकर आदी सर्व शिक्षकांनी मेहनत घेतली.



# खोपोलीतील शिवस्मारक सुशोभीकरण काम रखडले

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीतील शीळफाटा येथील छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा परिसराचे सुशोभीकरणच्या कामासाठी आमदार महेंद्र थोरवे यांच्या आमदार निधीच्या माध्यमातून २५ लाखाहून अधिक निधी पालिकेला प्राप्त झाला आहे. या निधीत अधिक भर टाकून पालिकेच्या माध्यमातून हे सुशोभीकरणचे काम सुरू झाले. मात्र मागील काही महिन्यांपासून काम बंद असून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व येथील अन्य बाबींची दुरावस्था होत असल्याने नागरिकांत संताप व्यक्त केला जात आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा असलेल्या ठिकाणी स्टाईल्स निघाल्या असून , सर्वत्र अस्वच्छता वाढत आहे. पुतळा समोरील ताम्रपत्र उघडले असून त्यावर मोठ्या प्रमाणावर धूळ जमा झाली आहे. येथे लावण्यात आलेल्या कारंज्या व रंगीत

## पालिकेचे दुर्लक्ष



रोषणाई अनेक महिन्यांपासून बंद असून , पालीकेचे याकडे दुर्लक्ष झाले आहे.एकीकडे सुशोभीकरणासाठी लाखोंचा निधी वारंवार खर्च केला जात असून प्रत्येक वेळी पूर्वी लावण्यात आलेली सामुग्री काढून नवीन सामुग्री लावण्यात येत आहे .

खोपोलीतील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा या दोन्ही परिसराचे सुशोभीकरणचे काम मागील दीड वर्ष सुरू असून काम सुरू असतानाच दीड वर्षापूर्वी करण्यात आलेली कामे आत्ता पुन्हा नव्याने करण्याची वेळ पालिकेवर आली आहे.

शहरातील हे दोन्ही पुतळा सुशोभीकरणसाठी मागील पाच सात वर्षांत एक कोटीहून अधिक निधी खर्च पडूनही अपेक्षित असलेली व दर्जेदार कामे केली जात नसल्याने महापुरुषांची ही दोन्ही स्थळे वारंवार निकृष्ट कामे करून पालिका निधीचा पद्धद्धशीरपणे गैरवापर करण्याचे केंद्र बनले असल्याचा संशय शहरातील शिवभक्त व भीम अनुयायांनी व्यक्त केला आहे.

**ठेकेदारांच्या काही तांत्रिक कारणांमुळे वर्तमान स्थितीत शिवाजी महाराज पुतळा सुशोभीकरणाचे काम बंद आहे मात्र लवकरच हे काम सुरू होईल व नागरिकांच्या मनातले व अपेक्षित असे सुशोभीकरण पूर्णत्वास येईल .तसेच तुटलेल्या स्टाईल्स व येथील अन्य त्रुटी तातडीने दुरुस्त करण्यात येतील. -अनुप दुरे-पाटील, मुख्याधिकारी खोपोली**

**शिवस्मारकाचे सुशोभीकरण काम उच्च दर्जाचे व्हावे, यासाठी आम्ही आग्रही आहोत. हे काम तातडीने पूर्णत्वास जाण्यासाठी पालिका प्रशासनाकडे वेळोवेळी विचारणा केली जाते. -डॉ. सुनील पाटील, शिवसेना नेते, खोपोली**

# वीज वितरणच्या भोंगळ कारभारावर खालापूरकर त्रस्त

## वाढीव वीजदर, अनामत रकमेविरोधात दिले निवेदन

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर शहरात व त्या परीसरात वारंवार होणारा खंडित वीजपुरवठा यामुळे ग्रामस्थ हैराण झाले असून त्यात अनामत रक्कम भरण्याबाबत आलेली भरमसाठ बिले याच्या विरोधात खालापूर ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अभियंता यांना सहाय्यक अभियंता खालापूर यांच्यामार्फत निवेदन दिले आहे.

खालापूर शहराला व त्यालगत असणाऱ्या गावांना गेले काही महिने वीज पुरवठा सुरळीत होत नसून त्यामुळे ग्रामस्थांत संताप व्यक्त होत आहे. पाण्यासाठी दिवस रात्र वाट पाहत बसावे लागते. वीज पुरवठा खंडित झाल्यावर सर्व शासकीय यंत्रणेवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे त्यावर अवलंबून



असणारे छायांकित प्रती करणारे दुकानदार, टंकलेखन करणारे, शीतपेय दुकानदार यांचेही नुकसान होत आहे. विद्युत पुरवठा बंद झाल्याने त्याचा परिणाम नेट बँकिंग, नेट वर्किंग यावर होतो आणि ग्रामीण भागातून शासकिय कामासाठी येणाऱ्या जनतेचीही कामे मार्गी लागत नाहीत. स्थानिक व्यापारी यांचेही नुकसान होत आहे. वीज मंडळाकडे अनामत रक्कम असतानाही त्यांनी वाढीव सुरक्षा अनामत रक्कम च्या नावाने वाढीव दिलेली बिले न परवडणारी आहेत.

कोणकोणते शुक्ल आकारले जाते याबाबतही द्विधा मनस्थितीत आहे. याचा परिणाम बिल न भरणे असा होत आहे. याची दखल विद्युत मंडळाचे अधिकारी घेताना दिसत नाहीत. त्यामुळे खालापूर तालुका व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र शहा यांनी खालापूर शहरातील व परिसरातील जनतेच्या वतीने विद्युत मंडळाचे अधिकारी यांना निवेदन सादर करून या अडीअडचणी सोडविण्यासाठी खालापूर येथे प्रशासकीय कार्यालय असावे अशी मागणी करण्यात आली आहे. याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. यावेळी महावितरणचे सचीन धनुधर्मी यांनी ग्रामस्थांना समाधानकारक उत्तर दिली. माजी सरपंच बेबीताई साळवी, नरेंद्र शहा, उमेश गावंड, सचीन कळमकर, अमित जगताप, दिपक पाटील, योगेश मेढेकर, दिनेश फराट, पुरुषोत्तम वाणी, सुरेश गायकवाड, मनोहर भोसले, बाळू कोठेकर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# रायगड जिल्हा कुंभार समाजाच्या सभेत विविध विषयांवर चर्चा

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कुंभार समाज त्रैमासिक सभा पेण येथे पार पडली. खारघर येथे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात मरण पावलेल्या व कुंभार समाजातील मरण पावलेल्या समाज बांधवांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या सभेत समाज उन्नतीचे विविध दिशादर्शक कार्यक्रम ठरले.


दिलीप साळवी यांनी मागील तळा येथे झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून दाखवून केली. समाजाला सरकारकडून कोणकोणत्या योजना आहेत आणि त्या आपण कशा प्रकारे अमलात आणू शकतो, त्या संदर्भात रायगड जिल्हा कुंभार समाज अध्यक्ष अनंत महाडकर यांनी सर्वाना समजावून सांगितले. हमरापूर ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आल्याबद्दल सायली मांडलेकर यांनी लहानग्या जागेतून उत्तुंग भरारी घेऊन आपली मेणबत्ती घराघरात पोचवणारी



दीप्ती कुंभार, कोकण विभाग अध्यक्ष निवडून आलेले राजेंद्र मंगरुळकर या सर्वांचा सत्कार करण्यात आला.

रायगड जिल्हा विद्यार्थी गुणगौरव सोहळा आयोजनावर यावेळी चर्चा करण्यात आली आणि हा कार्यक्रम लवकरच होणार आहे असे जाहीर करण्यात आले. सभेचे आयोजन पेण कुंभार समाज यांनी केले होते. सभेसाठी कोकण विभाग अध्यक्ष राजेंद्र मंगरुळकर, रायगड जिल्हा अध्यक्ष अनंत महाडकर, युवक अध्यक्ष शरद कुंभार, विवाह समस्या निवारण अध्यक्ष गजानन चौलकर, उपाध्यक्ष नंदकुमार चिरनेरकर, युवा उपाध्यक्ष कुंदन विनेरकर, सचिव दिलीप साळवी, पेण अध्यक्ष शरद मांडलेकर, पेण युवक अध्यक्ष किरण मंगरुळकर, पेण महिला अध्यक्ष गीता कुंभार, माजी अध्यक्ष वसंत कोलाटकर, रवी प्रवीण कुंभार, कार्याध्यक्ष रमेश दहिवलिकर, कोकण विभाग खजिनदार वसंत कुंभार, राम साळवी, राजेंद्र साळवी, दिलपेश वाडेकर, सुनील वाघोस्कर, रुपेश कुंभार उपस्थित होते.

# सुधागड पाली येथे हिवताप दिन साजरा



**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र पाली व सुधागड पाली येथे जागतिक हिवताप दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त प्रतिज्ञा घेऊन रॅली काढण्यात आली. यावेळी डास प्रतिबंधक उपाययोजना करण्याचे घोषवाक्य देण्यात आले. शास्त्रज्ञ डॉ. रॉवर्ट रॉस यांनी हिवताप परोपजीवी जंतूंचा शोध लावला. याच जागतिक हिवताप दिनाचे औचित्य साधून पाली शहरामध्ये किटकजन्य आजार जनजागृती व्हावी या उद्देशाने रॅली काढून नागरिकांना हिवताप व किटाणू यांची माहिती देण्यात आली.

या रोगाचे निदान, वेळेवर आणि परिणामकारक उपचार तसेच रोगनियंत्रण उपाययोजना यांच्याबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यासाठी आरोग्य विभागाचे अधिकारी ,तसेच अत्यंत मूलभूत पातळीवर काम करणारे आघाडीचे आरोग्यसुविधा कर्मचारी तसेच भागीदार संघटना यांनी एकत्र येऊन काम करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

यावेळी सुधागड तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत मढवी, वैद्यकीय अधिकारी डॉ. सायली मानकर, डॉ. ममता पांडे, तालुका हिवताप पर्यवेक्षक वाय. के.वारगुडे, आरोग्य सहाय्यीका स्वप्नजा देशमुख, आरोग्य सहाय्यक के. बी. मोकल, आरोग्य सहाय्यक एस. जी. गायकवाड, इश्रज सिद्धेश पाटील, सर्व आरोग्य सेवक, आरोग्य सेविका गटप्रववर्तक, आरोग्य विभागाचे सर्व कर्मचारी वृंद, आशा सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेण पालिकेतर्फे जागतिक अर्थ दिन साजरा

**पेण : प्रतिनिधी**

२२ एप्रिल हा दिवस दरवर्षी अर्थ दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. त्याअनुषंगाने पेण नगरपरिषदेच्या वतीने २२ ते २८ एप्रिल २०२३ या कालावधीत अर्थ आठवडा साजरा करण्यात येत आहे.

अर्थ आठवडा साजरा करताना निसर्गाच्या पंचमहाभूतांच्या (पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश) या घटकांचे सवंर्धन करण्याच्या दृष्टीने पेण नगरपरिषद मार्फत २६ एप्रिल रोजी माझी वसुंधरा शपथ घेण्यात आली. तसेच प्लास्टीक पिशवी वापर बंदीच्या अनुषंगाने





पेण नगरपरिषद कार्यालयात बचत गटामार्फत कापडी पिशवीचा स्टॉल उभारण्यात आला असून पेण नगरपरिषद कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी यावेळी कापडी पिशव्या खरेदी केल्या.

या स्टॉलचे उदघाट्न मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास प्रशासकीय अधिकारी राजाराम नरूटे, आरोग्य निरीक्षक शिवाजी चव्हाण, पाणीपुरवठा अभियंता अंकिता इसळ, माजी नगरसेवक संतोष पाटील, आबासाहेब मनाळ, विद्युत अभियंता रेश्मा करबेले, सुहास कांबळे, प्रशांत ढवळे, रमेश देशमुख, भरत निंबरे, उमंग कदम, शेखर अभंग, विनायक बनसोडे तसेच इतर कर्मचारी व डाटा एन्ट्री ऑपरेटर उपस्थित होते.

या स्टॉलवरून सर्व नागरीकांनी कापडी पिशवी वापर करण्याचे आवाहन मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी केले आहे.

# गुजरातचा मुंबईवर दणदणीत विजय

## फलंदाजी आणि गोलंदाजीतही वर्चस्व



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

मुंबई इंडियन्सचा संघ मंगळवारी येथे झालेल्या आयपीएल लढतीत निष्प्रभ ठरला. गतविजेत्या गुजरात टायटन्सने मुंबई इंडियन्सचा ५५ धावांनी धुव्वा उडवला. हार्दिक पांड्याच्या सेनेचा हा पाचवा विजय ठरला.

शुभमन गिल (५६ धावा), डेव्हिड मिलर (४६ धावा) व अभिनव मनोहर (४२ धावा) यांच्या धडाकेबाज फलंदाजीमुळे गुजरात टायटन्सने २०७ धावांचा डोंगर उभारला होता. त्यानंतर राशीद खान (२/२७), नूर अहमद (३/३७) या अफगाणिस्तानच्या फिरकी जोडगोळीच्या प्रभावी कामगिरीसमोर मुंबई इंडियन्सच्या फलंदाजांचा निभाव लागला नाही. मुंबईला २० षटकांत ९ बाद १५२ धावांपर्यंतच मजल मारता आली.

गुजरातच्या २०८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईचा कर्णधार रोहित शर्मा पुन्हा एकदा अपयशी ठरला. त्याला गुजरातचा कर्णधार हार्दिक पांड्याने स्वतःच्या गोलंदाजीवर अवघ्या दोन धावांवर झेलबाद केले. इशान किशन व कॅमेरून ग्रीन या जोडीने मुंबईची धावसंख्या ४३पर्यंत नेली, पण राशीद खानच्या गोलंदाजीवर फटकेबाजी करताना इशान जोश लिटलकरवी १३ धावांवर झेलबाद झाला. त्यानंतर ग्रीन (३३ धावा) व सूर्यकुमार यादव (२३ धावा) यांनी थोडीफार झुंज दिली, मात्र दोघांनाही नूर याने बाद करीत मुंबईला आणखी संकटात टाकले. मुंबईसाठी नेहल वढेरा याने सर्वाधिक २१ चेंडूंत ४० धावा केल्या. गुजरातच्या नूर अहमदने चार षटकांत ३७ धावा देत तीन विकेट्स घेतल्या, तर राशीद खानने चार षटकांत २७ धावा देत दोन गडी बाद केले.

तत्पूर्वी नाणफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना शुबमन गिलने अप्रतिम फलंदाजी करीत अर्धशतकी खेळी केली. मुंबईच्या कुमार कार्तिकेयच्या गोलंदाजीवर शुबमन ५६ धावांवर बाद झाल्यानंतर अभिनव मनोहरने धडाकेबाज फलंदाजी केली. अभिनव २० चेंडूंत ४२ धावा करून रिलेच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. मग डेविड मिलरने आक्रमक फलंदाजी करून धावसंख्येचा आलेख चढता ठेवला. त्याने २२ चेंडूंत ४६ धावा कुटल्या, तर राहुल तेवतियाने पाच चेंडूंत २० धावांची खेळी केली. या दोघांनी ७१ धावांची भागीदारी रचली. या धावांच्या जोरावर गुजरातने २० षटकांत सहा विकेट्स गमावत २०७ धावांपर्यंत मजल मारली.

# कर्जतच्या कुस्ती आखाड्यात पुण्याचा दीपक मोहिते अजिंक्य



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतकरांचे ग्रामदैवत श्री धापया महाराज यांच्या उत्सवानिमित्त १०० वर्षांहून अधिक वर्षांची परंपरा असलेला कुस्तीच्या आखाड्यात शेवटची कुस्ती पुण्याचा दीपक मोहिते आणि येवल्याचा ज्ञानेश्वर केरे यांच्यात रंगली. मोहितेने केरे याला चितपट केल्याने तो अजिंक्य ठरला. मलंगगड भाल येथील कृष्णा ठोंबरे या दिव्यांग कुस्तीगीराने कुस्त्या चितपट करून सर्वांना अचंबित केले.

सकाळी नऊ वाजल्यापासून स्थानिक कुस्तीगीरांमध्ये कुस्ती होऊन कुस्त्यांना प्रारंभ झाला. कर्जत तालुका कुस्तीगीरी अध्यक्ष भगवान धुळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या वेळी ज्येष्ठ पंच मारुती ठाकरे, देवस्थानचे अध्यक्ष गणेश शिंदे, महेंद्र चंदन, सचिन दगडे, गौरव भानुसघरे, हेमंत पवार, अमित गुप्ता, प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.

सकाळच्या सत्रात ४५ आणि दुपारच्या सत्रात ५२ अशा एकूण ९७ कुस्त्या झाल्या. सकाळच्या सत्रात शेवटची कुस्ती किरण काळण (कल्याण) आणि दीपक मोहिते (पुणे) यांच्यामध्ये चांगलीच रंगली व ती बरोबरीत सुटली. या कुस्तीसाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी ११ हजार रुपयांचे पारितोषिक ठेवले होते. दोन्ही सत्रात पंच म्हणून दीपक भुसारी, दत्तात्रय म्हसे, दत्तात्रेय पालांडे आणि मारुती ठाकरे यांनी काम पाहिले.

शेवटची महत्त्वपूर्ण कुस्ती पुण्याच्या दीपक मोहिते आणि येवल्याच्या ज्ञानेश्वर केरे यांच्यामध्ये रंगली. यामध्ये मोहिते याने केरेला चितपट करून अजिंक्यपद पटकावले. या कुस्तीसाठी कर्जतच्या नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांनी २१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक ठेवले होते. सूत्रसंचालन दिलीप ठाकरे यांनी केले.

रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, नगरसेवक संतोष पाटील, बळीराम देशमुख, संतोष निलधे, भानूदास मिसळ, स्वप्नील पालकर आदींनी या आखाड्याला भेट दिली. या कुस्ती स्पर्धेत मुंबई, पुणे, सातारा, सोलापूर, उस्मानाबाद, नाशिक आदी भागांतून आलेले पैलवान सहभागी झाले होते. कर्जत तालुक्याच्या ग्रामीण भागातून आलेले असंख्य कुस्तीप्रेमी या वेळी उपस्थित होते.

# भारत-पाकिस्तान हॉकी संघ भिडणार

### चेन्नईतील आशियाई चॅम्पियन्स हॉकी स्पर्धेत चीनचाही सहभाग

**चेन्नई : वृत्तसंस्था**

या वर्षी ऑगस्टमध्ये भारतात चेन्नई येथे होणाऱ्या आशियाई चॅम्पियन्स हॉकी स्पर्धेसाठी संघ पाठवण्यास पाकिस्तानने संमती दिली आहे. त्यामुळे हॉकीच्या मैदानावर पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तान या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमधील झुंज बघायला मिळणार आहे.

या स्पर्धेत आशियातील सर्वोत्तम सहा संघ खेळणार आहेत. त्यापैकी यजमान भारत, गतविजेते दक्षिण कोरिया, मलेशिया, जपान या चार देशांनी यापूर्वीच आपला सहभाग निश्चित केला होता. पाकिस्तान व चीन यांच्या सहभागाबाबत गुरुवारपर्यंत निर्णय होईल, असे संयोजन समितीने सांगितले होते. त्यापूर्वीच या दोन्ही देशांनी खेळण्याची तयारी दर्शवली आहे.

हॉकी तमिळनाडूचे अध्यक्ष शेखर मनोहरन म्हणाले की, पाकिस्तानच्या होकारामुळे आम्ही आनंदी आहोत. चीनही येणार आहे. त्यामुळे स्पर्धेची रंगत अधिक वाढेल. या स्पर्धेच्या निमित्ताने भारतात १७ वर्षांनी पहिल्यांदाज चेन्नईत हॉकीचे आंतरराष्ट्रीय सामने होणार आहेत. त्याचबरोबर भारत-पाकिस्तान हे प्रतिस्पर्धी प्रथमच भारतात एकमेकांसमोर येणार आहेत.

# अर्जुन तेंडुलकरच्या गोलंदाजीने ब्रेट ली प्रभावित



**मुंबई : प्रतिनिधी**

महान फलंदाज सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुनने इंडियन प्रीमियर लीग कारकिर्दीला सुरुवात केली आहे. मुंबई इंडियन्स संघाकडून खेळताना अर्जुनने यंदाच्या आयपीएलमध्ये आतापर्यंत एकूण तीन सामने खेळले व दोन विकेट्स घेतल्या आहेत. अर्जुनने डेथ ओव्हर्समध्ये गोलंदाजी आक्रमणाचे नेतृत्व करण्यापासून आपला ठसा उमटवला आहे. ऑस्ट्रेलियाचा माजी वेगवान गोलंदाज ब्रेट ली अर्जुनच्या कामगिरीने खूप प्रभावित झाला आहे.

जेव्हा ब्रेट लीला विचारण्यात आले की, मुंबईमध्ये खेळताना अर्जुन तेंडुलकरने कोणत्या बॉलिंग स्पेलमध्ये गोलंदाजी करणे योग्य असेल? कारण त्याची सुरुवातीची फेज आहे? त्यावर तो म्हणाला, मला वाटते की तो सर्व स्पेलमध्ये गोलंदाजी करू शकतो. तो पुढे म्हणाला, मी अर्जुनच्या गोलंदाजीने खूप प्रभावित झालो आहे. मला वाटते की, तो मुंबई इंडियन्ससाठी गोलंदाजी करताना जबरदस्त फॉर्ममध्ये दिसत आहे. त्याची नवीन चेंडूवर गोलंदाजी उत्कृष्ट होत आहे. तो चेंडू अप्रतिम स्विंग करीत आहे. अर्जुन मधल्या षटकांसाठी अनुकूल असून जसजसा तो अनुभवी होईल तसतसे अधिक चांगली गोलंदाजी करेल. त्याची डेथ ओव्हर्समध्ये गोलंदाजी वाखाणण्याजोगी आहे.

ब्रेट ली म्हणाला, माझा अर्जुनला सल्ला आहे की, टीकाकारांच्या म्हणण्याकडे लक्ष देऊ नको. वडिलांच्या कारकिर्दीतून शिक. सचिनलादेखील अशा चढउतारातून जावे लागते. जे लोक तुला लक्ष्य करण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यांचे ऐकू नको. लक्षात ठेवा की सोशल मीडियावर टीका करणाऱ्या बहुतेक लोकांनी त्यांच्या आयुष्यात एकही चेंडू टाकलेला नाही. ते फक्त कीबोर्ड योद्धे आहेत.

# कबड्डी स्पर्धेत 'जय भारत' विजेता

**मुंबई : प्रतिनिधी**

नवोदित क्रीडा मंडळातर्फे आयोजित जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेतील अंतिम सामन्यात जय भारत क्रीडा मंडळ संघाने विजय क्लब संघाचे कडवे आव्हान ३८-३२ असे संपुष्टात आणत जेतेपद पटकावले. जय भारतचा अनिकेत मिटके या गटातील सर्वोत्तम अष्टपैलू कबड्डीपटू ठरला.

श्रमिक जिमखान्यावर आयोजित केलेल्या या स्पर्धेत जय भारत संघाने लढतीत आधीपासूनच आपले वर्चस्व कायम राखले होते. अनिकेत मिटके आणि सिद्धेश सावंतच्या चढायांनी विजय क्लबचा बचाव भेदण्यात यश मिळवले. त्यामुळेच विजयी जय भारत संघाला मध्यंतरालाच २१-१९ अशी दोन गुणांची आघाडी मिळाली होती, पण विजय क्लबचे चढाईपटू कार्तिक मिश्रा आणि राज नाटेकर यांनी जय भारत संघाला एकेक गुणांसाठी संघर्ष करायला लावला. जय भारत संघाच्या ओमकार मोरेच्या ताकदीचा खेळही अतिशय बहारदार झाला. त्यामुळे त्यांचा विजय सुकर झाला.

तत्पूर्वी या गटातील उपांत्य लढतीत विजय क्लबने अमर क्रीडा मंडळाचे आव्हान ३०-२६ असे संपुष्टात आणले, तर जय भारतने बंड्या मारुती संघाला ३०-१३ असे नमवले होते.

# मिस्टर इंडिया शरीरसौष्ठव स्पर्धेत मुंबईच्या संतोष बंगेराला कांस्यपदक



**मुंबई : प्रतिनिधी**

सांगली येथे नुकत्याच झालेल्या मिस्टर इंडिया उदय २०२३ शरीरसौष्ठव स्पर्धेत मुंबईच्या संतोष बंगेरा याने कांस्यपदक मिळविले. याचबरोबर मुंबई उदयश्री २०२३ या स्पर्धेतही रौप्यपदकावर आपले नाव कोरले. यासोबतच महाराष्ट्र श्री उदय स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करीत राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याने नामांकन प्राप्त केले आहे.

संतोष बंगेरा मूळचे मंगलोरचा, पण त्याचे बालपण मुंबईतील काळाचौकी येथील अभ्युदयनगर या मराठमोळ्या वसाहतीत गेले आहे. तेथील यंग दत्ताराम व्यायामशाळेत त्याने व्यायामाचे धडे घेतले. तेथे मिस्टर इंडिया टायटल मिळवणारे वसंत सालियन,श्री शिवछत्रपती शिवाजी पुरस्कार विजेते तसेच चार वेळा मिस्टर इंडिया पुरस्कार प्राप्त प्रशांत नारकर यांच्या मार्गदर्शनाखाली बंगेराने शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी तयारी केली आणि त्याचाच परिपाक म्हणून हे यश त्याने मिळविलेले आहे.

मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या संतोष बंगेरा याने हे यश प्राप्त केल्याबद्दल त्याचे सर्वच क्षेत्रातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

## अपघातानंतर पंत आता 'एनसीए'मध्ये

**बंगळुरू : वृत्तसंस्था**



अपघातग्रस्त यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतची बंगळुरू राष्ट्रीय क्रिकेट अकादमी (एनसीए)मध्ये पुनर्वसन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पंतने स्वतः ही माहिती चाहत्यांना दिली.

रस्ता अपघात झाल्यानंतर क्रिकेटपासून दूर असलेला पंत सध्या बंगळुरूमध्ये आहे. आगामी आशिया चषक आणि भारतात होणाऱ्या ५० षटकांच्या विश्वचषक स्पर्धेत तो खेळणार नसल्याचे मानले जात आहे.

गेल्या वर्षाच्या अखेरीस पंत दिल्लीहून रुरकी येथील त्याच्या घरी जात असताना त्याच्या कारला अपघात झाला होता. सुदैवाने तो बचावला. आता तो तंदुरुस्त होत असून एनसीएमध्ये दाखल होत आहे.

# कराटे स्पर्धेत रेवदंडा संघ उपविजेता



(छाया : महेंद्र खैरे)

**रेवदंडा : प्रतिनिधी**

माणगाव येथे नुकत्याच झालेल्या गेशिन्काई कराटे स्पर्धेत रायगड जिल्हा कराटे असोसिएशन अंतर्गत रेवदंडा संघाने उपविजेतेपद पटकाविले. त्यांनी एकूण १७ सुवर्ण, चार रौप्य, एक कास्य अशी एकूण २२ पदकांची कमाई केली.

या स्पर्धेत मुरूड, अलिबाग, रोहा, माणगाव, श्रीवर्धन, तळा, महाड, नागोठणे, म्हसळा या तालुक्यांतील १५०हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील रेवदंडा संघ उपविजेता ठरला. यामध्ये सानिया प्रदीप फुलार, धनश्री वीरेंद्र घरत, पायल प्रवीण सुतार, ओम मेघेश घरत, परशुराम गणेश झावरे, संस्कार महेश पिळणकर, अलिजा नुरेआलम मुकरी, सलिना नुरेअलम मुकरी, श्लोक रामसिंग प्रजापती, तंजिला नुरेआलम मुकरी, सानिका संतोष बेनारे, शर्विल संजय कांबळे, स्नेहांकित संतोष ठाकूर यांनी सुवर्णपदक; तनुश्री जयेश सुतार, निलांगी नितीन टेकाळकर, सिद्धी राजेश मानकर यांनी रौप्यपदक, तर अथर्व सदानंद भगत याने कांस्यपदक जिंकले. या सर्व कराटे विद्यार्थ्यांना प्रशिक्षक शिहान नंदकुमार वरसोलकर, सेन्साय प्रशांत म्हात्रे, ओमकार वरसोलकर आदींचे मार्गदर्शन लाभले.

# आरसीएफ कामगार चषक आदिवासी कबड्डी स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर्स (आरसीएफ) लि. थळतर्फे अलिबाग प्रेस असोसिएशनच्या सहयोगाने १ मे रोजी आरसीएफ वसाहत कुरूळ येथील क्रीडा संकुलात कामगार चषक जिल्हास्तरीय आदिवासी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यात जिल्ह्यातील सुमारे ६४ आदिवासी संघ सहभागी होणे अपेक्षित आहे.

दिवसभरात बाद पद्धतीने खेळविल्या जाणाऱ्या या स्पर्धेत अंतिम चार संघात उपांत्य फेरीचे सामने होतील, तर उपांत्य फेरी विजेत्या दोन संघांत अंतिम सामना होईल. अंतिम विजेत्या संघास आरसीएफचे कार्यकारी संचालक (थळ) श्री अनिरुद्ध खाडीलकर यांच्या हस्ते कामगार चषक आणि २५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक प्रदान करण्यात येईल. उपविजेत्या संघास १५ हजार रुपयांचे पारितोषिक आणि ट्रॉफी देण्यात येईल. याशिवाय तिसऱ्या व चौथ्या क्रमांकांच्या संघास तसेच वैयक्तिक उत्कृष्ट कामगिरीसाठीही आकर्षक रोख पारितोषिके आणि ट्रॉफी देण्यात येणार आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नाममात्र २० रुपये नोंदणी शुल्क असून प्रथम येणाऱ्या पहिल्या ६४ संघांची नोंदणी केली जाईल. नोंदणी आणि स्पर्धेविषयी अधिक माहितीसाठी आरसीएफचे पांडुरंग सोनार (८८०५०८०२३२) किंवा रमेश पाटील (७७२२०९३६४४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कंपनी प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# एसएसजी फाऊंडेशन, श्री संस्कृती, शिवनेरी मंडळाची विजयी सलामी

## कुमार गट कबड्डी स्पर्धा





**मुंबई : प्रतिनिधी**

एसएसजी फाउंडेशन, श्री संस्कृती, शिवनेरी मंडळ यांनी श्री सिद्धेश्वर मंडळाने आयोजित केलेल्या कुमार गट कबड्डी स्पर्धेत विजयी सलामी दिली. मुंबईच्या प्रभादेवी येथील राजाभाऊ साळवी मैदानातील स्व. सचिन अनंत शेलार क्रीडांगणार ही स्पर्धा खेळली जात आहे.

उद्घाटनीय सामन्यात धारावीच्या एसएसजी फाउंडेशनने वरळी गावातील वारसलेन संघाचा ३९-०९ असा पाडाव केला. मध्यांतराला २१-०६ अशी आघाडी घेणाऱ्या एसएसजीने तोच खेळ कायम ठेवत ३० गुणांच्या फरकाने सामना सहज खिशात टाकला. जितेश दळवी, जितेंद्र यादव यांच्या झंझावाती चढाया आणि तेजस टक्केचा भक्कम बचाव यामुळे हे शक्य झाले. वारसलेनचा विराज दुर्गावले चमकला.

श्री संस्कृती प्रतिष्ठानने आपली विजयी घोडदौड राखताना शताब्दी संघाला ४१-३६ असे नमविले. विश्रांतीला १९-२० अशा पिछाडीवर पडलेल्या संस्कृतीने नंतर ही किमया साधली. रोशन राय, रोहित यादव यांच्या चौफेर चढाया, तर दाविश अवसरी याच्या भक्कम पकडी यामुळे संस्कृतीने हा विजय मिळविला. शताब्दीच्या शिवा अरसन, व्यंकटेश शंकर, साहिल कदम यांचा चतुरस्त्र खेळ संघाला विजयी करण्यास थोडा कमी पडला.

शेवटचा सामना मात्र अत्यंत चुरशीने खेळला गेला. क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणाऱ्या या सामन्यात अखेर शिवनेरी मंडळाने बाजी मारली. शिवनेरीने अमरहिंदला ३३-३२ असे चकवित ही किमया साधली. पहिल्या डावात १०-२० अशा १० गुणांनी पिछाडीवर पडलेल्या शिवनेरीने शेवटच्या दोन मिनिटांत विजय साध्य केला. दुसऱ्या डावात यश राक्षेच्या तुफानी चढाया व अजय गुरवच्या भक्कम पकडीच्या जोरावर शिवनेरीने शेवटच्या क्षणी प्रतिस्पर्ध्यावर लोण देत आघाडी घेतली आणि विजय संपादन केला. अमरहिंदच्या सुमित चौधरी, नितीन शिर्के, साहिल शिगवण यांना शेवटच्या काही मिनिटात संयम राखता न आल्याने पराभव पत्करावा लागला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com